
कोहिनूर राईसचे अधिकृत विक्रेते
मे आर.के.थिगळे

राईस हाऊस
जुना मोंढा,बीड
फोन : 9422240681
* रॉयल ट्रॉफी
* बिर्याणी राईस
* कोलम
* अंबामोहर
* काडीमुच

बीडचा **लोकप्रश्न**
BEEDCHA LOKPRASHNA
Epaper : www.lokprashna.com
Eportal : www.live.lokprashna.com

हॉटेल सद्गुरू

प्युअर व्हेज
Bharat Petroleum
नाथ पेट्रोलियम
वडीगोद्रीच्या पुढे ८ किमी
बीड- संभाजीनगर हायवे
थिगळे बंधू, बीड
संपर्क:-९८५००४७३२९,
९४०४६५२९२८

बीड । महाराष्ट्र ■ वर्ष १७ वे ■ अंक ३८ ■ सोमवार २३ फेब्रुवारी २०२६ ■ Reg.No.L/181/RNP/Beed/2023-2025 ■ RNI Reg. No.MAHMAR/2010/31131 ■ पाने ८ ■ ३ रु.
BEED / Maharashtra ■ Year 17 ■ Issu 38 ■ Monday 23 February 2026 ■ Reg.No.L/181/RNP/Beed/2023-2025 ■ RNI Reg. No.MAHMAR/2010/31131 ■ Pages 8 ■ ₹ 3

# आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन


## कर्जमाफी,स्व.अजित पवारांचा अपघात आदी प्रश्नांवरून विरोधक सरकारला घेरणार

**मुंबई । वार्ताहर**

**आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर सायंकाळी होणाऱ्या चहापानावर विरोधकांनी पत्रकार परिषद घेऊन बहिष्कार टाकला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे. त्याबाबत शंका व्यक्त होत आहे. सरकारची भूमिका संदिग्ध असल्याचा आरोप उबाठा गटाचे भास्कर जाधव यांनी केलाय. शेतकरी, ड्रग्सचा प्रश्न, सोलर लाइटमध्ये बारा हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ही करण्यात आलाय.**

या पत्रकार परिषदेला उबाठा गटाचे आदित्य ठाकरे, अनिल परब, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील हेही उपस्थित होते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कोणीही उपस्थित नव्हते. भास्कर जाधव म्हणाले, चहापानाकरिता वैयक्तिकरित्या मुख्यमंत्री महोदयांचे पत्र आले होते. परंतु आम्ही सरकारच्या चहापानाला जाणार नाहीत. सत्ताधारी पक्षाचे वर्तन सभ्येतेचे असावे लागते. लोकशाही व संविधानाचे सन्मान करणारे वर्तन, सभ्य वागणूक सत्ताधारी पक्षाची लागते. पण प्रचंड बहुमतामुळे सत्ताधारी पक्ष मस्तीमध्ये आहे. ज्यांना लोकशाही, संविधानाचा आदर नाही, त्या ठिकाणी आम्ही चहापानाला जाणार नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघात झाला की घातपात झाला आहे, अशी शंका महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे. याबाबत सरकारची भूमिका संदिग्ध आहे. सरकारने स्पष्ट भूमिका मांडलेली नसल्याचा आरोप भास्कर जाधव यांनी केलाय.राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. पिकविम्यापोटी सरकारने शेतकऱ्यांनी पैसे पान २ वर ⏭

### कोणतीही योजना बंद होणार नाही–मुख्यमंत्री फडणवीस



राज्यात लाडक्या बहिणींसह सर्वच योजना ह्या त्या त्या वर्गाच्या हिताचा विचार करून तयार करण्यात आलेल्या आहेत. विरोधकांकडून लाडकी बहिण योजना बंद होणार अशा अफवा सोडल्या जात आहेत. मात्र लाडक्या बहिणींसह कोणतीही योजना बंद होणार नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. याच बरोबर त्यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात लाचलुचपत विभागाने केलेल्या कारवाई वरूनही पत्रकारांना स्पष्टपणे सांगितले की ही कारवाई माझ्याही कार्यालयात होवू शकते. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांचा थेट या प्रकरणाशी संबंध नाही. भ्रष्ट अधिकारी कर्मचारी असतील तर ते अडकणार असे सांगत त्यांनी मंत्री झिरवाळ यांना क्लिन चिट दिली.



### अर्थसंकल्पातून जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न–उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार



राज्याच्या अर्थसंकल्प अधिवेशनाला उद्यापासून सुरूवात होणार आहे. या अधिवेशनाआधी महायुती सरकारची पत्रकार परिषद पार पडली. अधिवेशनाआधी झालेल्या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सरकारची भूमिका मांडली. यावेळी सुनेत्रा पवार यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवारांनी राज्याचा ११ वेळा अर्थसंकल्प सादर केल्याचे त्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनातून जनतेला न्याय देणार असल्याचं सांगितलं. सुनेत्रा पवार म्हणाल्या, 'यंदाच्या महायुती सरकारचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. मोठ्या विश्वासाने जनतेनं साथ दिली. पान २ वर ⏭

## इनशॉर्ट

### राज्यावर पुन्हा अवकाळीचे संकट

**मुंबई । वार्ताहर**

राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामाचा अनुभव घेता येतोय. सकाळी थंडी आणि दुपारी कडाक्याचे उन्ह अशी स्थिती आहे. यादरम्यानच राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यात मोठा अवकाळी पाऊस झाला, त्याचा परिणाम शेतीवर झाला हाताशी आलेले शेतकऱ्यांचे पीक वाहून गेले. पुढील दोन दिवसात राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. उत्तरेकडे अजूनही थंडी गायब आहे. पण राज्यातील थंडी जवळपास गेली. पहाटे थोडासा गारठा जाणवत आहे. फेब्रुवारी महिन्यातही अनेक भागात पाऊस हजेरी लावताना दिसतोय. यादरम्यानच राज्यातील काही शहरातील वायू प्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला. मुंबईमध्ये वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे.भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच राज्यात पाऊस हजेरी लावणार आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. यासोबतच वातावरणात सतत चढउतार बघायला मिळेल. विजांच्या कडाकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला.

### मनरेगाच्या मजुरांना मिळणार तीन महिन्यांच मजूरी

**मुंबई । वार्ताहर**

तीन महिन्यांपासून मजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यातील हजारो मजुरांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) अंतर्गत प्रलंबित असलेली मजुरी आता होळीपूर्वी मजुरांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. शासनाने ६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून पुढील दोन ते तीन दिवसांत देयके वर्ग होण्याची माहिती प्रशासनाने दिली.अकुशल मजुरांचे वेतन तांत्रिक कारणांमुळे आणि वाढीव लेबर बजेटच्या प्रस्तावामुळे रखडले होते. केंद्र शासनाकडे वाढीव लेबर बजेट मंजुरीसाठी प्रस्ताव विचाराधीन असल्याने निधी मिळण्यास उशीर झाला. परिणामी मेळघाट, पालघर आणि इतर आदिवासीबहुल भागांत मजुरांवर आर्थिक ताण निर्माण झाला होता.होळीचा सण तोंडावर असताना हातात पैसे नसल्याने मजुरांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र आता निधी मंजूर झाल्याने आदिवासी बांधवांचा सण गोड होणार आहे.

### शरद पवार पुन्हा रूग्णालयात

**पुणे । वार्ताहर**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या समस्त कार्यकर्त्यांसाठी आणि पदाधिकाऱ्यांसाठी आधारवड असणाऱ्या शरद पवार यांची प्रकृती पुन्हा एकदा काहीशी बिघडली आहे. त्यामुळे शरद पवार यांना पुन्हा एकदा पुण्यातील रुबी हॉल रुणालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. काहीवेळापूर्वीच शरद पवार यांना रुणालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. शरद पवार नुकतेच पाच दिवस रुणालयात राहून घरी परतले होते. मात्र, आता त्यांना पुन्हा रुणालयात दाखल आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांना काहीसा अशक्तपणा जाणवत आहे. त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने त्यांना अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रुबी हॉस्पिटलमध्ये त्यांना सलाईन लावली जाईल, अशी माहिती आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## कुर्ल्यातील यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक निलंबित

### नवगण शिक्षण संस्थेलाही शिक्षणाधिकाऱ्यांची नोटीस

**बीड । वार्ताहर**

राज्यात सुरू झालेल्या दहावीच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी बीड तालुक्यातील कुर्ला येथील परीक्षा केंद्रावर नियमबाह्य प्रकार उघडकीस आला होता. शाळेच्या गच्चीवर मंडप उभारल्याप्रकरणी संबंधित मुख्याध्यापकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. परीक्षा व्यवस्थेतील या गंभीर त्रुटीमुळे शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली असून संबंधित शिक्षण संस्थेवरही कारवाईची टांगती तलवार आहे.

बीड तालुक्यातील कुर्ला येथील यशवंत विद्यालय या परीक्षा केंद्रावर शुक्रवारी दहावीच्या परीक्षेदरम्यान वर्गखोल्या अपुऱ्या पडल्याने थेट शाळेच्या गच्चीवर मंडप उभारून विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास बसवण्यात आले होते. या तात्पुरत्या मंडपात चार हॉल तयार करून तब्बल १०० विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली, पान २ वर ⏭

## जिजाऊ पतसंस्थेच्या घोटाळ्यात अनिता शिंदेचा जामीन नामंजूर

**बीड । वार्ताहर**

येथील माँ साहेब जिजाऊ पतसंस्थामधील कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेल्या पतसंस्थेच्या अध्यक्षा अनिता बबन शिंदे यांना मोठा धक्का बसला असून, त्यांचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने फेटाळला आहे.जिजाऊ मल्टिस्टेट पतसंस्थेत दोन वर्षांपूर्वी मोठा घोटाळा उघडकीस आला होता. या प्रकरणात पतसंस्थेचे पान २ वर ⏭

## परळीत स्व.महादेव मुंडे यांच्या मुलांना मारहाण

**परळी । वार्ताहर**

परळी शहरात पिग्मी एजंट स्व. महादेव मुंडे यांच्या अल्पवयीन मुलांना एका अनोळखी मुलाने शिवीगाळ करत मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली असून, याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

घटनेनंतर त्यांची आई ज्ञानेश्वरी मुंडे यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेऊन अधिकृत तक्रार नोंदवली. पोलिसांनी नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.या तक्रारीनुसार, महादेव मुंडे यांची मुले परीक्षा देऊन घरी परतत असताना काही अज्ञात व्यक्तीने त्यांना अडवून शिवीगाळ करत मारहाण केली.

दरम्यान, या घटनेची गंभीर दखल घेत खा. सुप्रिया सुळे यांनी पान २ वर ⏭

## ट्रॅक्टर–दुचाकी अपघात; तरुणाचा जागीच मृत्यू

**गेवराई । वार्ताहर**



तालुक्यातील धोंडराई फाटा परिसरात ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीच्या अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २२) सायंकाळी ५ वाजता घडली. या अपघातात बेलगाव (ता. गेवराई) येथील नामदेव भगवान राऊत (वय ३८) यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, नामदेव राऊत हे कामानिमित्त तसेच नातेवाईकाच्या उमापूर येथील लग्नसमारंभाला उपस्थित राहून दुचाकीवरून बेलगावकडे परतत होते. पान २ वर ⏭

## केजमध्ये गुटखाविक्रीवर पोलिसांचा छापा

**केज । वार्ताहर**

केज पोलिसांनी शहराजवळील एका किराणा दुकानावर छापा टाकून महाराष्ट्रात आरोग्याच्या दृष्टीने बंदी असलेला विविध प्रकारचा गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत १५ हजार ४८२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

केज शहरापासून बीड रस्त्यावर असलेल्या रेणुका किराणा दुकानातून देवगाव येथील महादेव अर्जुन मुंडे हा बेकायदेशीररीत्या गुटख्याची विक्री करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे फौजदार लक्ष्मण कीर्तने, पोलीस शिपाई पंचफुला गंधकवाड व बळीराम म्हेत्रे यांच्या पथकाने शनिवारी (दि. २२) सकाळी ११.१० वाजता छापा मारला.दुकानाची झडती घेतली असता प्रिमियम पान २ वर ⏭

## पंतप्रधान आवास योजनेतील ग्रामीण लाभार्थ्यांसाठी अतिरिक्त निधी मंजूर

**बीड । वार्ताहर**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर समाजातील लाभार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासाठी एकूण ६० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास महाराष्ट्र शासन यांनी मान्यता दिली आहे.

या निधीच्या वितरणासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण गृहनिर्माण) येथील संचालक यांना नियंत्रण अधिकारी, तर उपसंचालक यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे दोन्ही अधिकारी सिडको भवन, नवी मुंबई येथे कार्यरत आहेत.निधी खर्च करताना वित्तीय नियमावली व महाराष्ट्र अर्थ नियमावलीनुसार कोणतीही आर्थिक अनियमितता होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात



आल्या आहेत. तसेच निधी खर्चानंतर उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी महालेखापाल व संबंधित यंत्रणांना सादर करण्याची पान २ वर ⏭

## जिल्ह्यात ३३ केंद्रावर झाली पोलीस पाटलांची परिक्षा

### जिल्हाधिकारी, सीईओंकडून परीक्षा केंद्रांना भेटी

**बीड । वार्ताहर**

जिल्ह्यातील पोलीस पाटील पदांच्या रिक्त असलेल्या तब्बल १ हजार १७९ जागांसाठी येत्या रविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी लेखी परीक्षा पोलीस बंदोबस्तात शांततेत व सुरळीत पार पडली. सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत जिल्ह्यातील बीड, आष्टी, माजलगाव, अंबाजोगाई आणि परळी या शहरांतील ३३ परीक्षा केंद्रांवर एकूण १० हजार ८८६ उमेदवारांनी ही परीक्षा दिली



तर ४५९ उमेदवार अनुपस्थित राहिले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. बीड जिल्ह्यात १ हजार १७९ पोलीस पाटील पदांसाठी ११ हजार ३४५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. पान २ वर ⏭

## महेश साखर कारखाना यावेळी गाळप करणार

### एक तपाचा वनवास संपला-भीमराव धोंडे

**आष्टी । वार्ताहर**

अष्टी तालुक्याची कामधेनू असलेल्या महेश सहकारी साखर कारखाना मागिल १२ वर्षापासून बंदअवस्थेत होता.साखर कारखाना नवीन संचालक मंडळाच्या ताब्यात गेला आहे. शेतक-यांचे नेतेमा.आ.भिमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने कर्ज भरून कारखाना ताब्यात घेतल्यानेशेतकऱ्यांसाठी आशेचा किरण निर्माण केला आहे.अनेक वर्षांपासून बंद असलेल्या साखर कारखान्याचेरविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी श्रीफळ वाढवून पूजन करून पान २ वर ⏭



# डोळ्यात मिर्चीपुड टाकून व्यापाऱ्याकडील पावणे सहा लाखाचे दागिने चोरले

अंबाजोगाई । वार्ताहर

तालुक्यातील डीघोळअंबा गावाजवळ शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजेच्या सुमारास एका सराफा व्यापाऱ्याला अडवून त्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकत अंदाजे ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. धारूर तालुक्यातील बिभीषण गणपती गायके हे व्यापारी आपल्या दुचाकीवरून जात असताना दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार अज्ञात हल्लेखोरांनी हा धाडसी दरोडा टाकला. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि विशेषतः व्यापारी वर्गात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बिभीषण गायके हे दर शनिवारी व्यवसायानिमित्त डीघोळअंबा गावात दागिने विक्रीसाठी जातात. शनिवारी सकाळी ते जुन्या होळ मार्गाने डीघोळअंबा शिवारातील दर्ग्याजवळ पोहोचले असता पाठीमागून आलेल्या २० ते २५ वयोगटातील चार तरुणांनी त्यांची दुचाकी अडवली. आरोपींनी काहीही विचार करण्यापूर्वीच गायके यांच्या डोळ्यात लाल तिखट फेकले ज्यामुळे त्यांना काहीही दिसणे अशक्य झाले. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्याकडील दागिन्यांची बॅग हिसकावून पोबारा केला. या बॅगेत १२ ग्रॅमचे गंठण, ४ ग्रॅमचे झुंबर, कानफुले आणि मंगलसूत्र असे एकूण ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे मौल्यवान दागिने होते.

घटनेची माहिती मिळताच युसुफ वडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. लुटारूंनी आपले चेहरे रुमालाने बांधले होते अशी माहिती पीडित व्यापाऱ्याने पोलिसांना दिली आहे. भरवस्तीच्या आणि वर्दळीच्या रस्त्यावर अशा प्रकारे धाडसी चोरी झाल्याने खळबळ उडाली असून व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून तातडीने तपासाची चक्रे फिरवली आहेत

# बोरगाव हायस्कूल बोरगाव तळवट येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**रायमोह । वार्ताहर**

आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळ बीड चे बोरगाव हायस्कूल बोरगाव तळवट येथे आज दहावीच्या मुलांचा निरोप समारंभ संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री.शंकररावजी जगताप साहेब , प्रमुख पाहुणे श्रीहरी विद्यालय वाहेगाव(आम्ला)शाळेचे मुख्याध्यापक श्री.के.डी.राऊत सर,श्री साळुंके सर,या शाळेचे माजी विद्यार्थी सनदी लेखापाल श्री.नारायण गाडे,श्री.दिलीप काका गाडे यावेळी उपस्थित होते.या कार्यक्रमाप्रसंगी दहावीच्या काही विध्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले व त्यानंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना नवी दिशा व शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.नववी च्या विध्यार्थिनी कु.गौरी गाडे व कु.गौरी घोलप यांनी केले प्रास्ताविक बोरगाव हायस्कूल बोरगाव त.चे मुख्याध्यापक श्री.घोडके सर यांनी केले तर आभार ज्येष्ठ शिक्षक श्री.विघ्ने सर यांनी केले.यावेळी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# एसटी कर्मचाऱ्यांना फेब्रुवारीच्या पगारासोबत येणार थकीत हप्ता

मुंबई । वार्ताहर

महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या (एसटी) सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या वेतन वाढीच्या थकीत हप्त्यापोटी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. हा निधी प्राप्त झाल्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्या पगारासोबतच थकीत हप्ता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे, अशी महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत होता. महामंडळाची आर्थिक स्थिती पाहता, वेतन वाढीच्या हप्त्यांची जबाबदारी शासनाने उचलावी, अशी मागणी कामगार संघटनांकडून होत होती. यावर तोडगा काढण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी सविस्तर चर्चा केली होती. या चर्चेअंती, एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये अनुदान स्वरूपात देण्याचे राज्य सरकारने मान्य केले होते.

पान ८ वरून

## कोकणातून

व अनुभवी शेतकरी यांनी मार्गदर्शन केले.

मराठवाड्यातील शेतीला पाणी मिळावे व या भागातील दुष्काळ दूर व्हावा यासाठी सरकार पश्चिमी वाहिनी नद्यांचे कोकणात जाणारे यातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी विविध योजना राबवित आहे. ही योजना मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी असली तरी सध्या या योजनेतून नाशिक व इतर भागातच कामे सुरू आहेत, सरकारला जर बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करायचा असेल तर बीड जिल्ह्यातील शेतीला नेमके किती पाणी मिळणार आहे हा आकडा सरकार व बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सांगावा असा प्रश्न या बैठकीत शेतकऱ्यांनी उपस्थित केला. जायकवाडी धरणाचे पाणी नांदेड पर्यंत गेले, मात्र हे पाणी बीड जिल्ह्यातील ऐंशी टक्के शेतीला मिळत नाही, माजलगाव धरण व गेवराई तालुक्यातून जाणार्या कालव्याचे पाणीही सरकारने कमी केले, आता १६८ टीएमसी पाण्यापासूनही बीड जिल्हा वंचित राहिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या नशिबी ऊसतोड, तरुणांचे स्थलांतर व आत्महत्या कायम राहत्याल. त्यामुळे १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, सर्व बीड जिल्हा पाण्याखाली येईल का, यासाठी सरकार व लोकप्रतिनिधी यांनी काय केले, याची माहिती जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी शेतकर्यांना द्यावी, अशी मागणीही यावेळी शेतकर्यांनी केली. या बैठकीस शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

लोकप्रतिनिधींनी भूमिका मांडावी

२०४७ सालापर्येंत विकसित भारत करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाच्या वतीने शेती सिंचन वाढविणे, हेही एक धोरण आहे. याच धोरणाचा भाग म्हणून सिंचन योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांतून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, यासाठी काय योजना करण्यात येणार आहे व किती टीएमसी पाणी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळेल यावर पालकमंत्री, खासदार व आमदार यांनी भूमिका मांडावी, अशी मागणीही या बैठकीत करण्यात आली आहे.

शेतकरी करणार व्यापक आंदोलन

जायकवाडी धरण झाले तेव्हा बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला हे पाणी मिळाले नाही, जायकवाडी धरणाचे आपल्याला जे पाणी मिळते त्यात २०१८ मध्ये कपात करण्यात आली. आताही कोकणच्या पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हिस्सा न मिळाल्यास शेतकर्यांच्या पिढ्यानपिढ्या बरबाद होतील. त. त्यामुळे बीड जिल्ह्यातील वंचित शेतीला पाणी मिळावे, यासाठी येत्या काळात व्यापक जनआंदोलन करण्याचा निर्धारही या बैठकीत शेतकऱ्यांनी केला.

## बीडकर त्रस्त,

ओल्या व सुका कचऱ्यामुळे परिसरात उग्र दुर्गंधी पसरत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यातच या कचऱ्यावर वराहांचा मुक्त संचार सुरू असल्याने कचरा सर्वत्र पसरून परिसर अधिक अस्वच्छ बनत आहे. यामुळे स्वच्छता अभियान केवळ कागदावरच राहते की काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.सर्व प्रभागांमध्ये घंटागाडी नियमित सुरू झाल्यास शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागू शकतो. मात्र घंटागाडी सेवा नेमकी का सुरू होऊ शकत नाही, याबाबत अद्याप बीड नगरपालिका प्रशासनाकडून कोणतेही स्पष्ट उत्तर देण्यात आलेले नाही, ही बाब अधिक चिंताजनक ठरत आहे.

नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी एकत्र बैठक घेऊन, सीईओंच्या उपस्थितीत ठोस निर्णय घेतल्यास सर्व प्रभागांमध्ये घंटागाडी सेवा सुरू होऊ शकते, असे नागरिकांचे मत आहे. लोकांनी निवडून दिलेले नगरसेवक व नगराध्यक्षांनी यासाठी तातडीने पुढाकार घ्यावा आणि शहर स्वच्छतेस प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा बीडकर नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## माजलगावात ऊसतोड

लक्षात घेता कामगारांची नियमित आरोग्य तपासणी अत्यंत आवश्यक असून, या उपक्रमामुळे विविध आजारांचे लवकर निदान व प्रतिबंध शक्य होणार आहे.

या शिबिराचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन कार्यकारी संचालक आर. सी. बडगुजर, मुख्य शेतकी अधिकारी रवि देशमुख तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. सुशिल जाधव यांनी केले आहे.आमदार प्रकाश सोळंके, धैर्यशील सोळंके, चेअरमन विरेंद्र सोळंके आणि व्हाईस चेअरमन जयसिंह सोळंके यांच्या संकल्पनेतून हे अभिनव आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

## आदित्य पॉलिटेक्निकच्या

उपाययोजनांचा प्रत्यक्ष अभ्यास केला.

या वेळी स्टेशन मास्टर अतुल मराठे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय रेल्वेची प्रशासकीय व तांत्रिक कार्यपद्धती समजावून सांगितली. रेल्वे मार्गांची रचना, सिग्नल व नियंत्रण प्रणाली, ट्रॅक देखभाल, तसेच अपघात टाळण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या खबरदाऱ्या याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी क्षेत्रात जबाबदारीची जाणीव आणि नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, यावरही त्यांनी विशेष भर दिला.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व व्यवस्थापन समजले. तांत्रिक दृष्टिकोन, निर्णयक्षमता, व्यावसायिक शिस्त आणि संघभावना यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही वाढला.या भेटीत स्थापत्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. वरपे, प्रा. अजय दुधाळ, प्रा. गोंठे यांच्यासह ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. भेटीचे नियोजन प्रा. प्रशांत दुधाळ व प्रा. अजय दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ही भेट ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

चौकट

प्रत्यक्ष अनुभवातून तांत्रिक दृष्टिकोन विकसित

औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना रेल्वे ट्रॅकची रचना, पूल बांधकामातील तांत्रिक बाबी, सिग्नल प्रणाली व देखभाल प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यामुळे वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा अधिक सखोल व स्पष्ट अभ्यास करण्यास मदत झाली.भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी, जबाबदाऱ्या व कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता निर्माण झाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढला.

–प्राचार्य डॉ. राहुल खडके

## राष्ट्रसंत गाडगे बाबा

होणार असून ही मिरवणूक बशीरगंज, कारंजा, बलभीम चौक, धोंडीपुरा, माळवेस मार्गे मार्गक्रमण करत राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुतळ्याजवळ पोहोचणार आहे. तेथे महाप्रसादाने जयंती उत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे.या जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या समाजसुधारक विचारांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हे आवाहन महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष सुधीर जाधव, राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, रवी जाधव, विलास जाधव, पप्पू शिंदे, जगन्नाथ शिंदे, मनोज वाघमारे, गणेश राऊत, जयंत राऊत, जिल्हा सचिव प्रवीण साळुंखे, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, उपाध्यक्ष शितल राऊत, कार्याध्यक्ष संतोष भालेकर, शहर सचिव अतुल साळुंखे, प्राध्यापक विजय जाधव, अमोल काळे, मनोज नवले, तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष संजय साळुंके, उपाध्यक्ष नितीन नवले आणि सचिव महेंद्र वाघमारे यांनी केले आहे

## शिवरायांनी उभारलेले

सामान्य जनते बद्दल संवेदनशीलता त्यांच्या राज्यात होती.त्यामुळे आजच्या राज्यकर्त्यांनी त्यांचे आदर्श घेऊन प्रशासन चालविण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या वेळी कार्यक्रमास कॉलनीतील प्रा.संदीपान हिंगे,प्रा.सतिष चव्हाण, अँड.अशोक शिंदे,अँड.दिलीप मोटे, प्रमोद देसले,बाबासाहेब बटुळे,दिपक शिरसागर,अनिल तौर,तलाठी शेंबडे पाटाल,सुदर्शन निकम,गणेश तौर ,पियुष बटुळे,समर्थ गायकवाड,गोविंद मोटे,युवराद शिरसागर, आदी सह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे संचलन अँड.दिलीप मोटे तर आभार पियुष बटुळे यांनी मानले.

पान १ वरून

## अर्थसंकल्पातून जनतेला

महायुतीला सत्ता दिली. त्या जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. अजितदादांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला'.'अजित पवारांनी २०११ साली पहिल्यांदा अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर २०२५ मध्ये त्यांच्या कारकिर्दीत शेवटचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातील झालेली वाढ आपल्याला महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकडे न्यायची आहे. अजितदादांनी आर्थिक शिस्तीशी कधीही तडजोड केलेली नाही. त्यांनी विकासाशी समतोल राखला, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या.

' अजितदादांच्या कारकिर्दीतला १२ वा अर्थसंकल्प ठरला असता. मात्र, ते अचानक आपल्यांना सोडून गेले. त्यांच्या पश्चात अर्थसंकल्पाची तयारी झाली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ बिलीयन डॉलर नेण्याचा अजितदादांचा ध्यास होता.त्यासाठी सातत्याने ते प्रयत्नशील होते. आर्थिक शिस्त आणि विकासाचा समतोल हेच त्यांच्या कार्याचे सूत्र होतं. यंदा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सादर करतील. अजितदादांनी लाडकी बहीण योजनेला कधीही पैसा कमी पडून दिला नाही. ही योजना त्यांनी कायम सुरू ठेवली, असेही पवारांनी यावेळी सांगितले.

## आजपासून

घेतले आणि त्यानंतर ही योजनाच बंद केली आहे. सोलर लाइट संदर्भात सरकारने खूप गाजावाजा केला आहे. बारा हजार कोटींचा भ्रष्टाचार सोलर प्रकल्पात झाल्याचा आरोपही जाधव यांनी केलाय.

संपूर्ण राज्यात कायदा –सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. हे राज्य आता उडता पंजाब होत आहे का ? अशी भिती निर्माण झाली आहे. ड्रग्स प्रचंड प्रमाणात विकले जात आहे.एका बाजूला चहापानाला बोलवत आहे. तर दुसऱ्या बाजूला युवा पिढीला ड्रग्स दिले जात आहे. नागपूरमध्ये वाइट घटना घडतात. त्यांचा चहापानाला जायची आमची इच्छा नाही. मंत्रालयात एसीबी एक दालन सील करते, याचा अर्थ सरकार भ्रष्टाचाराच्या दलदलित अडकलेले असल्याचा आरोपही भास्कर जाधवांनी केलाय.

एकीकडे कर्जमाफी देतो म्हणाले होते, अजून कर्जमाफी नाही. लाडकी बहिण योजनेचे पैसे आता सरसकट दिले जात नाही. आता ५७ लाख महिला योजनेतून महिला कमी केल्या आहेत. सभापती किंवा अध्यक्ष हे पक्षाचे कार्यक्रमाला जात आहे. विधानसभेचे अध्यक्ष अलिबागला हे जमिनीचा तंटा सोडायला गेले होते की जमीन लाटायला गेले होते, असा सवाल भास्कर जाधवांनी उपस्थित केलाय.

## परळीत स्व.महादेव

'एक्स' वर पोस्ट करत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी नमूद केले की, स्व. महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाचा तपास सुरू असून काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, या टोळीतील काही जणांकडून आता मुंडे कुटुंबीयांना दमदाटी केली जात असल्याचा आरोप ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केला आहे.यासंदर्भात ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बीडचे पोलीस अधीक्षक यांना पत्र देऊन कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी आणि आतापर्यंतचा घटनाक्रम पाहता, कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे स्पष्ट होत आहे.

महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाला दोन वर्षांहून अधिक कालावधी लोटला असून, या प्रकरणासाठी विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. या एसआयटीचे प्रमुख पंकज कुमावत आहेत. १७ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे या प्रकरणातील काही संशयितांची ब्रेन मॅपिंग व नार्को चाचणी पार पडली आहे.

## जिजाऊ पतसंस्थेतील

अध्यक्ष, संचालक व व्यवस्थापक यांच्याविरोधात एकूण चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घोटाळ्यात सुमारे २ हजार ठेवीदारांचे अंदाजे १६५ कोटी रुपये अडकले असून, पतसंस्था दिवाळखोरीत निघाली आहे. या प्रकरणात अनिता शिंदे, बबन शिंदे यांच्यासह इतर आरोपी सध्या अटकेत आहेत.या घोटाळ्याची गंभीर दखल घेत शासनाने एमपीआयडी कायद्यांतर्गत प्रस्ताव मंजूर केला असून, पतसंस्थेवर अवसायक नियुक्त करण्यात आले आहेत. प्रशासनाकडून एमपीआयडी अंतर्गत पुढील कार्यवाही सुरू आहे.दरम्यान, अनिता शिंदे यांनी यापूर्वी सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता; मात्र तो न्यायालयाने फेटाळला. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात धाव घेतली होती. या अर्जावर झालेल्या सुनावणीदरम्यान ठेवीदारांच्या वतीने ॲड. नरसिंह जाधव यांनी प्रभावी युक्तिवाद करत जामिनास कडाडून विरोध केला. सर्व बाजूंचा विचार करून न्यायालयाने अनिता शिंदे यांचा जामीन अर्ज नामंजूर केला.

## कुल्र्यातील यशवंत

तर केंद्रावर एकूण २९३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.हा प्रकार समोर आल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने चौकशी करत सविस्तर अहवाल बोर्डाकडे सादर केला. या केंद्राचे संचालक व शाळेचे मुख्याध्यापक अभिषेक राऊत यांना निलंबित करण्याचे निर्देश संस्थेला देण्यात आले होते. त्यानुसार संबंधित संस्थेने अभिषेक राऊत यांना निलंबित करून त्याबाबतचा अहवाल शिक्षण विभागाकडे सादर केला आहे.

दरम्यान, याच संस्थेच्या बारावी परीक्षेशी संबंधित प्रकरणात गुन्हा नोंद होऊनही पाच कर्मचाऱ्यांचे निलंबन न केल्याने नवगण शिक्षण संस्था यांना सहआरोपी का करण्यात येऊ नये, अशी कारणे दाखवा नोटीस माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी बजावली आहे. त्यामुळे संबंधित संस्थेच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## पंतप्रधान आवास

जबाबदारीही राज्य व्यवस्थापन कक्षावर सोपविण्यात आली आहे.हा खर्च सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी असलेल्या तरतुदीतून करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील गरजू लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी मोठा आधार मिळणार असून, गृहनिर्माण योजनेला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## केजमध्ये गुटखाविक्रीवर

झेड एन जर्दा जाफरानी, हिरा रॉयल, राजनिवास सुगंधी पानमसाला, विमल केसरयुक्त पानमसाला, हिरा बाओबाजी पानमसाला, व्ही–१ टोबॅको आदी विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी हा सर्व गुटखा जप्त केला.या प्रकरणी फौजदार लक्ष्मण कीर्तने यांच्या फिर्यादीवरून आरोपी महादेव मुंडे याच्याविरुद्ध केज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे करीत आहेत.

## ट्रॅक्टर–दुचाकी

धोंडराई फाट्याजवळ ऊस भरून साखर कारखान्याकडे जाणाऱ्या ट्रॅक्टर–ट्रॉलीशी त्यांची दुचाकी धडकली. अपघातात ट्रॅक्टरचे चाक अंगावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.मयत नामदेव राऊत यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, दोन मुली, भाऊ व भावजयी असा परिवार असून या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## महेश साखर

प्रत्यक्ष मशनरी दुरुस्ती व ओव्हर ऑइलिंगकामाचा शुभारंभ मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिल व बायलर डिजी सेटचे विधीवत पुजन करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली पुढील गळीत हंगामात कारखाना सुरू होणारचअसल्याचा विश्वास व्यक्त करत शेतकरी बांधवांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऊसाचे उत्पन्नवाढवण्याचे आवाहन मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी केले ते कडा महेश सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष कामकाज पुजन प्रसंगी बोलत होते.यावेळी अजय दादा धोंडे,अभयराजे धोंडे,राजु काका धोंडे,नियामत बेग ,ॲड.हनुमंत थोरवे,आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे, राजाराम ननवरे,स्विकृत सदस्यबबनराव औटे, हरिभाऊ जंजिरे,सोनाजी गांजुरे,लांडगे मामा, पांडुरंग गावडे,शहादेव गर्जे, नानाभाऊ वाडेकर, अंकुश मुंडे, बजरंग कर्डिले, सरपंच दादा जगताप, सुनिल शिंदे,कुंडलिक आस्वर, उत्तम बोडखे, संजय खंडागळे,संतोष नागरगोजे,अक्षय विधाते,शरद गर्जे, संचालक बाबासाहेब आंधळे,आदी उपस्थित होते.पुढे बोलताना मा.आ.भिमरावजी धोंडे म्हणाले कीकारखाना अनेक वर्षापासून बंद असल्याने बरेच काम करणे आहे.सहा सात महिन्यांचा कालावधी आहे. या कालावधीमध्ये काम पूर्ण करून पुढील गळीत हंगामामध्ये कारखाना सुरू करणार आहोत. आपल्याला जर लायसन नसतं मिळालं तर हा कारखाना भंगारात विकावा लागला असता काही लोकांचातसा डाव होता.आपण सर्व जण मिळुन कारखाना सुरू करणार आहोत.हि वास्तु आपल्याला टिकवूनठेवायची आहे.आपण कारखान्यासाठी मोर्चा काढला यासाठी शेतकरी बांधवांनी उसाच्या आता नवीन २५जातीचे नवीण वाण आले असून आम्ही लखनऊ वरून ७३१८१ जातीचा नमुना त्या ऊसाची ऍव्हरेज१०० टन प्रती एकर आहे.लखनऊचे क्लीन कमिशनर यांना विनंती केली आहे. प्रायोगिक तत्त्वावरती रोपे किंवा बेणे देण्याची मागणी केली आहे.मिळून जातील ऊसाची लागवड शेतकरी बांधवांनी करून जास्तीतजास्त उत्पन्न घ्यावे असे आवाहन केले तालुक्यातील अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या साखरकारखान्याच्या पुनरुज्जीवनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. कारखाना परिसरात श्रीफळवाढवून विधिवत पूजन करून नव्या सुरुवातीची घोषणा करण्यात आली.वेदमंत्रांच्या उच्चारात पूजाकरण्यात आली आणि कारखाना लवकरच सुरू होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, कारखाना सुरू झाल्यास परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनामोठा दिलासा मिळेल तसेच स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. अनेक वर्षांपासून बंदअसल्याने परिसराच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला होता. आता नव्या व्यवस्थापनाच्या माध्यमातून कारखाना पुन्हा कार्यरत करण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया सुरू करण्यात आल्या आहेत.शेतकरी व नागरिकांनीही कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असून यापूजन सोहळ्यामुळे परिसरात आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.या कार्यक्रमास कार्यकारी संचालक वकारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार बांधव मोठ्या उपस्थित होते.

## जिल्ह्यात ३३

प्रत्यक्ष परीक्षेच्या दिवशी बीड, पाटोदा, माजलगाव, अंबाजोगाई व परळी या तालुक्यांतील परीक्षा केंद्रांवर १० हजार ८८६ उमेदवारांनी परीक्षा दिली, तर ४५९ उमेदवार परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे सतत देखरेख ठेवण्यात आली होती. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १३६ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले होते. दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. परीक्षेची अंमलबजावणी, शिस्तबद्ध वातावरण, सुरक्षा व्यवस्था तसेच उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांचा त्यांनी आढावा घेतला आणि परीक्षा प्रक्रिया सुरक्षित व पारदर्शक ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता पोलीस पाटील पदासाठीची ही महत्त्वाची परीक्षा शांततेत व यशस्वीरीत्या पार पडली.

परिक्षेसाठी उपस्थित व अनुपस्थित उमेदवार संख्या

शहर / एकूण / उपस्थित / अनुपस्थित
बीड / ४३०५/ ४१३५ / १७०
पाटोदा / २००५ / १९२२ / ८३
माजलगाव / २१५६/ २०७४ / ८२
अंबाजोगाई / १९८७ / १९०५ / ८२
परळी / ८९२ / ८५० / ४२
एकूण / ११३४५ / १०८८६ / ४५९

# अपघात, संशय आणि सत्य

अजितदादांच्या अपघाती निधनाने राज्याच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात एक खोल पोकळी निर्माण केली आहे. अनपेक्षित घटना मनाला स्वीकारायला वेळ लागतो, हे खरे; पण या घटनेभोवती निर्माण झालेल्या प्रश्नांच्या वादळामुळे ती पोकळी अधिकच अस्वस्थ करणारी ठरत आहे. घटना घडून गेलेली असली, तरी तिचं सत्य, तिचं स्वरूप आणि तिच्यामागील परिस्थिती याबाबत लोकांच्या मनात निर्माण झालेला संभ्रम दूर व्हायचा बाकी आहे.अपघात हे मुळातच अतार्किक असतात. त्यात तर्क शोधण्याचा प्रयत्न झाला की प्रश्नांची मालिका सुरू होते. या प्रकरणात आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या शंकांनी त्या प्रश्नांना अधिक धार दिली आहे. समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या चित्रफिती, तांत्रिक बाबींवरील मुद्दे, अपघाताच्या दिवशी घडलेल्या कथित त्रुटी आणि अधिकृत माहितीचा अभाव – या साऱ्यामुळे संशयाची छाया अधिक गडद होत चालली आहे. रोहित पवार यांनी पत्रकार परिषदांद्वारे मांडलेले मुद्दे केवळ राजकीय आरोप म्हणून बाजूला सारणे सोपे असले, तरी त्यातील काही प्रश्न सर्वसामान्यांच्या मनातही उमटत आहेत, हे नाकारता येत नाही.या शंकांना उत्तर देण्याची जबाबदारी प्रत्यक्षात तांत्रिक यंत्रणांची होती. विमान अपघातासारख्या गंभीर घटनेत संबंधित हवाई वाहतूक विभाग, नियंत्रक संस्था किंवा तपास यंत्रणांनी अधिकृत आणि सविस्तर माहिती जनतेसमोर मांडणे अपेक्षित असते. विशेषतः ब्लॅक बॉक्स संदर्भातील माहिती आगीत नष्ट झाल्याचे सांगण्यात आल्यानंतर अविश्वासाची भावना वाढली आहे. अशा वेळी अधिक पारदर्शकता आणि संयमित संवाद आवश्यक असतो. मात्र, अधिकृत पातळीवरील शांततेमुळेच संशयाला खतपाणी मिळत आहे.या प्रकरणाला राजकीय वळण लागण्यास वेळ लागला नाही. सुरुवातीला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केलेल्या शंकेनंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माध्यमांसमोर येत परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर रोहित पवार यांनीच या विषयाचा धागा हातात घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद, पक्षविलीनीकरणाचा मुद्दा आणि सत्तेतील समीकरणे – या सगळ्यांचा या प्रकरणाशी थेट संबंध आहे का, हा वेगळा प्रश्न; पण त्या पार्श्वभूमीवर या शंका अधिक संवेदनशील ठरतात.दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षातील नेत्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. सत्ताधारी आघाडीत सहभागी असताना आणि संबंध मधुर असताना अशी मागणी पुढे येणे, हे स्वतःमध्येच अनेक संकेत देऊन जाते. ही मागणी रोहित पवार यांच्या आरोपांना प्रत्युत्तर म्हणून आहे का, पक्षातील अस्वस्थता शमवण्यासाठी आहे का, की जनमानसातील शंका दूर करण्यासाठी – याचे उत्तर काळच देईल.राजकारणात सोयीचा विचार अग्रक्रमाने होतो, हे वास्तव आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची झालेली फूट, त्यानंतरचे भावनिक आणि राजकीय हेलकावे, एकत्रीकरणाचे संकेत आणि त्याच वेळी घडलेला हा अपघात – या सर्व घटनांची सांगड घालताना लोकांच्या मनात नैसर्गिकच प्रश्न निर्माण होतात. समाजमाध्यमांच्या वेगवान युगात प्रत्येक प्रश्नाला अनेक शक्यतांची जोड मिळते आणि सत्य–असत्याच्या सीमारेषा धूसर होतात.अशा वेळी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेवर होणारी चौकशी. कोणतीही दुर्घटना राजकीय लाभ–हानीच्या चौकटीत अडकू नये. आरोप–प्रत्यारोपांच्या धुरळ्यात सत्य हरवू नये. अजितदादांच्या निधनासारखी दुःखद घटना ही केवळ एका पक्षाची किंवा एका कुटुंबाची बाब नाही; ती सार्वजनिक जीवनाशी निगडित आहे. त्यामुळेच तिच्या चौकशीबाबतही सार्वजनिक विश्वास अबाधित राहणे अत्यावश्यक आहे.आज घराघरांत एकच अपेक्षा आहे – सत्य काहीही असो, ते स्पष्टपणे आणि अधिकृतरीत्या समोर यावे. संशयाच्या सावल्या दूर व्हाव्यात. राजकारण आपले मार्ग शोधत राहील; पण लोकशाहीत जनविश्वास गमावला, तर तो परत मिळवणे कठीण असते. त्यामुळे या प्रकरणात सर्वांनी संयम, जबाबदारी आणि पारदर्शकतेचा मार्ग स्वीकारणे, हीच काळाची गरज आहे.

# वाहतुकीचे नियम पाळले तर मृत्यूचे प्रमाण घटेल-अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर

## जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप संपन्न

**बीड । वार्ताहर**

विद्यार्थी आणी नागरिकांनी रस्ता सुरक्षेचे नियम पाळले तर निश्रि्चतच रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी होईल आणि त्यामुळे मृत्यूचे प्रमाणही घटेल असे प्रतिपादन अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियान समारोप प्रसंगी बोलताना केले.



जिल्हा वाहतूक शाखा बीड यांच्या वतीने दि.०१ ते ३१जानेवारी दरम्यान जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप २० फेब्रुवारी रोजी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर संपन्न झाला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी सांगितले की रस्ते वाहतूक करताना रस्त्याच्या वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. यामुळे निश्रि्चतपणे रस्ते अपघातात प्राण जाणाऱ्यांची संख्या कमी होईल. विद्यार्थ्यांनी परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये. जे दुचाकी चा वापर करतात त्यांनी हेल्मेटचा व चार चाकी धारकांनी सीट बेल्टचा वापर करावा. रस्त्यावरून जाताना आपल्यासमोर एखादा अपघात घडला तर आपण अपघातग्रस्तांची मदत करावी. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये रस्ते वाहतुकीच्या नियमांची जागृती व्हावी हा रस्ता सुरक्षा अभियानाचा उद्देश आहे. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार , राहुल कुमार (भा.पो.से.), पोलीस उपाधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे, राखीव पोलीस निरीक्षक पांडुरंग दलाई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता अक्षय गव्हाणे ,सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरज पवार, रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल बोरा, बीड गुड्स ट्रान्सपोर्ट संघटनेचे कोषाध्यक्ष दिलीप वांगीकर व त्यांचे सहकारी, शालेय रिक्षा युनियनचे अध्यक्ष बाबुभाई व त्यांचे सहकारी, पगारिया ऑटो प्रायव्हेट लिमिटेड चे जनरल मॅनेजर दिलीप भाटिया, सहाय्यक व्यवस्थापक हर्ष साळवी आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व विजय जाधवर यांनी केले. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. चंपावती विद्यालय भगवान विद्यालय व शिवाजी विद्यालय या शाळेतील एनसीसी पथकाचे व चंपावती विद्यालयाच्या स्काऊट गाईडचे शिस्तबद्ध संचलन सादर झाले. समारोपाच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तर आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत विद्यालयाचे शिक्षक गाडेकर के. बी. व शेळके एम.बी.यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या सर्व अंमलदारांनी परिश्रम घेतले.

# भारताला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज- प्रा.डॉ. पांडुरंग सुतार

**बीड । वार्ताहर**

संकटांवर मात करत संघटनशक्ती वाढवणे, स्त्रीसन्मान राखणे, सुशासन प्रस्थापित करणे हे आजच्या समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे. भारताला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.पांडुरंग सुतार यांनी केले. अस्मिता प्रतिष्ठान, विठ्ठलाई फॉउंडेशन व आर बी डिजिटल च्या वतीने अस्मिता एजुकेशनल हब येथे आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर.बी. डिजिटलचे पदाधिकारी व अस्मिता प्रतिष्ठान चे अध्यक्ष डॉ. संभाजी शिंदे हे होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. पांडुरंग सुतार हे होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. गणेश खाडे आणि ॲड.सतीश वडमारे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. पांडुरंग सुतार यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेत उपस्थित नागरिकांना त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले. शिवाजी महाराजांचे विचार आजच्या समाजासाठी प्रेरणादायी असून एकता, शिस्त आणि देशप्रेम जोपासण्याची गरज असल्याचे सांगितले तसेच शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकत सामाजिक जबाबदारीची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढ्यातून आपण धैर्य, शिस्त, स्वाभिमान आणि न्यायासाठी लढण्याची वृत्ती अंगिकारली पाहिजे. संकटांवर मात करत संघटनशक्ती वाढवणे, स्त्रीसन्मान राखणे, सुशासन प्रस्थापित करणे हे आजच्या समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या आदर्शांवर चालूनच मजबूत आणि आदर्श राष्ट्र घडू शकते. अध्यक्षीय भाषणात डॉ. संभाजी शिंदे यांनी शिवाजी महाराजांचे सुशासन, स्त्री सन्मान आणि लोकहिताचे धोरण यावर विशेष भर दिला.

# दिनवेध

## राशीभविष्य

- **मेष :** कामामध्ये यश न आल्यामुळे चिंता राहील. भावंडांशी मतभेद टाळायला हवेत. विचाराने रहायला हवे.
- **वृषभ :** महत्त्वाची कामं पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. महत्त्वाच्या भेटीचे योग आहेत. कौटुंबिक प्रश्न सुटतील.
- **मिथुन :** कामाचं योग्य मूल्यमापन होईल. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. प्रियजनांच्या भेटी होतील.
- **कर्क :** अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या कमी होतील. प्राप्तीचं प्रमाण वाढेल.
- **सिंह :** अनुकूल प्रेरणा मिळणार आहे. योजलेली कामं मनासारखी होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल.
- **कन्या :** मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रश्नी समाधानकारक घटना घडतील. धनप्राप्ती.
- **तूळ :** कोणाच्याही मदतीची अपेक्षा करु नका. विचारातून कार्यसिद्धी होईल. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **वृश्चिक :** मानसन्मान वाढणार आहे. कार्यातील अडचणी दूर होतील. अपेक्षित कामं वेगानं मार्गी लागतील.
- **धनु :** जमीन आणि वाहनविषयक कामं मार्गी लागतील. गृहसौख्य लाभेल. अपेक्षित घटनांचा संभव.
- **मकर :** योजना सफल होतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा लाभेल. नोकरीत अनुकूलता राहील.
- **कुंभ :** शुभकार्याला सुरूवात करण्यास अनुकूल दिवस. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्य जपा.
- **मीन :** शुभवार्ता समजल्यामुळे दिवस आनंदात जाईल. कौटुंबिक प्रश्न सुटतील. सौख्य लाभेल.

## बोधकथा — छोटं काम, मोठा परिणाम

गावाजवळच्या तलावात खूप पाणी आलं तर ते गावात शिरु नये म्हणून जवळच बांध घातला होता. गावाला या तलावाचा बराच फायदा होता. तलावाच्या बाजूला शेराची झाडं होती. झाडाझुडपांमध्ये बरेच कीटक होते. चिलटं होती. या चिलटांचा जथा तलावावर येत असे. तलावाच्या दुसऱ्या बाजूला साधू राहत असे. तो रोज तलावावर येई आणि अंगावरील उपरणं काढून चिलटांना हाकलून देई. हा साधू काठावर उभं राहून चिलटं हाकलतो, हे काही तरुण मुलं बघत होती. साधू मात्र निष्ठेनं हे काम करत असे. एक दिवस साधू आजारी होता. त्याला तलावावर यायला जमलं नाही. त्याच दिवशी दोन हत्ती पाणी पिण्यासाठी तलावापाशी आले. तलावावर भरपूर चिलटं घोंगावत होती. त्यांच्या उपद्रवामुळे हत्ती सैरावैरा पळू लागले. त्यांच्या पायांनी बांध फुटला. नंतर तलाव फुटला, पाणी गावात शिरलं, माणसं हवालदिल झाली. चिलटांच्या प्रतापामुळे संपूर्ण गाव संकटात सापडलं. तेव्हा टिंगल करणाऱ्या मुलांना साधूच्या चिलटं हाकलण्याच्या छोट्याशा कृतीचं महत्त्व समजलं.

**तात्पर्य :** एखाद्याची छोटीशी कृतीही महत्त्वपूर्ण ठरते.

## २३ फेब्रुवारी — दिनविशेष


- **२००० :** मराठी व्याकरणाचे गाढे अभ्यासक वि.स.वाळिंबे यांचे निधन.
- **२०१३ :** विधानसभा निवडणुकीसाठी मेघालयमध्ये ८८ तर नागालँडमध्ये ८३.२७ टक्के मतदान.
- **२०१४ :** थोर शिक्षणतज्ज्ञ पी.बी.पाटील यांचे निधन.
- **२०१६ :** आपली संसद सौरऊर्जेवर चालणारी जगातील पहिली संसद ठरल्याचा पाकिस्तानचा दावा.
- **२०१८ :** अमेरिकेत एच–१बी व्हिसाची प्रक्रिया कठोर. भारतीय चिंतेत.

## जाणून घ्या — एलआयसीची गुंतवणूकवाढ

आर्थिक वर्ष २०२१ मध्ये एलआयसीची एकूण गुंतवणूक पाच लाख कोटींची मर्यादा ओलांडेल, असं एलआयसीचे अध्यक्ष एमआर कुमार यांनी सांगितलं. ते पुढे म्हणाले की, एलआयसी देशातील सर्वांत मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांपैकी एक आहे. इक्विटी आणि कर्ज बाजारात याची मोठी भूमिका आहे. एलआयसीकडून समभागांची खरेदी–विक्री निर्देशांकातील अस्थिरता दर्शवते. आर्थिक वर्ष २०२१ मध्ये एलआयसीने इक्विटी गुंतवणुकीत मोठा नफा कमावला. आतापर्यंत समभागांच्या विक्रीतून ३४ हजार ९६८ कोटी रुपयांचा नफा कमावला. आर्थिक वर्ष २०२० मध्ये एलआयसीने ६१ हजार ५९० कोटी रुपयांची इक्विटी खरेदी केली. गुंतवणूक करताना, एलआयसी विरोधाभासी रणनीती स्वीकारते, ज्यायोगे मार्केट तेजीत असते, तेव्हा बाजारात विक्री केली जाते. एलआयसी ग्राहक वस्तू, रिटेल, विमानचालन, भांडवली वस्तू, वाहन अशा क्षेत्रात शेअर्स खरेदी करते. इक्विटी, कर्ज दोन्हीत गुंतवणूक करते. त्याच्या निधीचा बराचसा भाग सरकारी सिक्युरिटीज, इतर हमी साधनांमध्ये गुंतवला जातो'.

## जपा आरोग्य — सॅकरीनचा वापर हानीकारक?

सॅकरीन हा रासायनिक प्रक्रियेद्वारा निर्मिलेला एक पदार्थ आहे. तो साखरेपेक्षा ४०० पट गोड आहे पण त्यात कॅलरीज नाहीत. याच गुणधर्माचा उपयोग करुन घेण्यासाठी काही अन्नघटकांमध्ये सॅकरीनचा वापर करतात. विशेषत: मधुमेहींसाठी सेवनयोग्य अन्न बनवण्यासाठी साखरेची गोडी टाळून सॅकरीनची गोडी वापरली जाते. सॅकरीनमुळे कॅन्सर होतो असा एक समज आहे. अर्थात याबाबत तज्ज्ञांमध्ये काही मतभेद बघायला मिळतात. मात्र याविषयी स्पष्टता येत नाही तोपर्यंत आपण तो पदार्थ टाळणंच चांगलं. असे घटक खाण्यापेक्षा मधुमेहींनी अगोड खाद्यपदार्थांच्या सेवनाची सवय लावून घ्यायला हवी. एकदा अगोड पदार्थांचं सेवन करण्याची सवय लागली की गोड चवीची उणिव जाणवत नाही असं अनेक जण सांगतात. तुम्ही अगोड चहा पिऊ लागला तर एखाद्या आठवड्यात तुम्हाला तो आवडू लागतो, हे लक्षात घ्यायला हवं.



एका संशोधनात सॅकरीन वा इतर तत्सम पदार्थांचं सेवन केल्याने इन्शुलिनचा स्राव होत असल्याचं आढळून आल्यामुळे दोन जेवणांमध्ये असा चहा पिणं आहार योजनेत बसतच नसल्याचं आहारतज्ज्ञ सांगतात.

सॅकरीनखेरीज ॲस्परटेम, मोनेलिन आणि सायक्लोमेट्स सारखे इतर स्वीटनर्स आहेत. त्यांचा वापर शीतपेयांमध्ये, फळांच्या रसांमध्ये, कॅन्समधून विकल्या जाणाऱ्या पदार्थामध्ये केला जातो. मात्र असे पदार्थ न सेवन करणं वा अत्यल्प प्रमाणात सेवन करणंच हिताचं ठरतं.

## पंचांग

विक्रम संवत्सर २०७९
शालिवाहन संवत् १९४७
संवत्सर : विश्ववसु , ऋतु: शिशिर
उत्तरायण–फाल्गुन शुक्ल प्रथमा,
उत्तरायण – फाल्गुन शुक्ल षष्ठी/ सप्तमी/
संत गाडगे बाबा जयंती, नक्षत्र–भरणी
वार–सोमवार २३ फेब्रुवारी २०२६
राहुकाल–सकाळी ०७/३० ते ०९/००
सुर्योदय ०७/०५ मि.,सुर्यास्त ०६/२५

## फॉरवर्डस

**आवडत्या व्यक्तीची साथ असेल तर अवघड वळणंही पार होतात**

दर्द की शाम हो या सुख का सवेरा हो

सब कुछ कबूल हैं अगर साथ हो

## माहीत आहे?

देवापाशी दिवा लावण्याचे अनेक लाभ सांगितले आहेत. जसं की दिवा लावल्यानंतर ज्योतीतून येणारा धूर वातावरण शुध्द करण्याचं काम करतो. दिवा जळताना येणाऱ्या तूप किंवा तेलाच्या सुगंधामुळे घरातील हानीकारक कण बाहेर जातात. तेलाचा दिवा मालवल्यानंतर त्याचा परिणाम अर्ध्या तासापर्यंत राहतो. तुपाचा दिवा मालवल्यानंतरही चार तासांपर्यंत त्याचा परिणाम राहतो. तेला–तुपाचा दिवा लावल्यानं कुटुंबातील सदस्यांना आरोग्यविषयक लाभ मिळतात. दिव्यावर लवंग धरून केलेला धूर आरोग्यदायी ठरतो.

## करिअरवाटा — भटकंतीतून कारकिर्दीची वाट

दोस्तांनो, तुमच्यापैकी अनेकांना तासनतास बसून कॉम्प्युटर बडवणं, नऊ ते पाच या वेळातली पारंपरिक नोकरी करणं आवडत नाही. त्यांना एकाच जागी बसण्यापेक्षा भटकंती करायला आवडते. परंतु फिरता फिरताही करिअर करता येतंच की! आपल्याकडे आजकाल अनेकविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. या पर्यायांविषयी जाणून घेऊ...

✻ इव्हेंट को ऑर्डिनेटर म्हणून काम करताना तुम्ही मस्त भटकंती करू शकता. विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या इव्हेंट्ससाठी तुम्हाला फिरता येईल. विविध फेस्टिवल्स तसंच ट्रेड शोजच्या आयोजनाची जबाबदारी घेता येईल. यासाठी देशविदेशात फिरून नव्या लोकांच्या ओळखी करून घेता येतील.

✻ इंग्रजीवर प्रभुत्त्व असेल तर या भाषेच्या अध्ययनाचं काम करता येईल. रशियन, मँडरिन, कोरियन अशा भाषा शिकून दुभाषा होता येईल. विविध देशांमध्ये इंग्रजीच्या शिक्षकांना मागणी असते. या निमित्ताने तुम्ही भरपूर फिरू शकता.

✻ बऱ्याच कंपन्यांमध्ये ट्रॅव्हल रायटरचं पद असतं. यासोबतच तुम्ही ट्रॅव्हल ब्लॉग सुरू करू शकता. प्रवासाशी संबधित मासिकं तसंच वृत्तपत्रांना लेख पाठवू शकता. छंद म्हणूनही तुम्ही हे लेखन करू शकता.

## खेचाखेची — आत्मचरित्र

**पती :** मी विचार करतोय की आत्मचरित्र लिहायला घ्यावं.

**पत्नी :** अय्या, किती छान कल्पना आहे. थांबा, लिहायला सुरूवात करण्याआधी मस्तपैकी चहा घ्या.

(ती किचनमधून चहा घेऊन येते.) ... हा घ्या आलं घातलेला गरमागरम चहा आणि बसा आत्मचरित्र लिहायला.

पण एक गोष्ट लक्षात घ्या, मी सांगते काय काय लिहायचं ते...

## रंजक प्रश्नोत्तरं

१) १९१० मध्ये निष्काम कर्मपीठाची स्थापना कोणी केली?

२) २०१० मध्ये अनंत भालेराव पुरस्कार कोणाला देण्यात आला?



३) आयआयएममध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना कोणती परीक्षा द्यावी लागते?

४) गारो, खासी, जैतीया या टेकड्या कोणाच्या समकालीन आहेत?

५) ब्लॅक फॉरेस्ट पर्वत कुठे आहे?

१) महर्षी कर्वे २) डॉ.सी.एन.आर.राव ३) कॅट ४) मेघालय ५) जर्मनी

## फॅशन फॅशन — ब्लाऊजही हवा हटके

प्रावरणांचे बरेच पर्याय असले तरी कशालाच साडीची सर येत नाही. पण कधी तरी एकाच पद्धतीने साडी नेसण्याचा कंटाळा येतो. थोड्या वेगळ्या पद्धतीने साडी ड्रेप करावीशी वाटते. अर्थात हे धाडस नसेल तर नेहमीच्या पद्धतीने साडी नेसा आणि ब्लाऊज थोड्या हटके पद्धतीनं कॅरी करुन वेगळा लूक मिळवा.

✻ तुम्हाला कॉंट्रास्ट लूक हवा असेल तर त्यासाठी प्रिंटेड साडीवर प्लेन ब्लाऊज अशी फॅशन कॅरी करू शकता. साडीच्या कॉंट्रास्ट रंगाचा ब्लाऊज घाला. भारतीय फ्रॅब्रिकसोबत ही फॅशन जास्त खुलून दिसेल. ✻ शीअरसारख्या (पारदर्शक आणि सुळसुळीत) कापडापासून तयार केलेली साडी नेसणार असाल तर तुम्हाला ब्लाऊजमध्ये बरेच प्रयोग करता येतील. तुम्ही वेगळ्या कापडाचे ब्लाऊज ट्राय करू शकता. तसंच ब्लाऊजवर नक्षीकाम किंवा थोडी कलाकुसरही चालून जाईल.

✻ ब्लाऊजचा पाठीमागचा भाग तुम्ही ट्रेंडी करू शकता. ब्लाऊजला एखादं लटकन लावू शकता. पाठीमागच्या भागाला तुम्ही त्रिकोणी, चौकोनी, आयताकृती असा आकार देऊ शकता. यामुळे साध्या पद्धतीने ड्रेप केलेल्या साडीलाही चार चाँद लागतील आणि तुम्ही पार्टीची शान ठराल. सो लेट्स एक्स्पिरिमेंट बिथ ब्लाऊज ...

## थोडक्यात

### निसानकडून नवीन ग्रॅव्हाइटच्या अनावरण

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एनएमआयपीएल) ने आज न्यू निसान ग्रॅव्हाइटची घोषणा केली. त्याची किंमत सुमारे ५.६५ लाख रुपये आहे. एक धाडसी आणि गेम-चेंजिंग ७-सीटर एमपीव्ही, ग्रॅव्हाइट निसानच्या भारतातील प्रवासात एका नवीन अध्यायाची सुरुवात करते. मेड इन इंडिया, मेड फॉर इंडियाने प्रेरित होऊन, ग्रॅव्हाइट हे निसान मोटर इंडियाच्या नवीन उत्पादन मोहिमेअंतर्गत बाजारात आणले जाणारे पहिले उत्पादन आहे - जे कंपनीची भारतातील मजबूत वचनबद्धता आणि उपस्थिती अधोरेखित करते.

### आयपीओ सोमवारी रोजी उघडणार

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठी कमर्शियल आणि इंडस्ट्रियल (सी अँड आय) रिन्यूएबल एनर्जी प्रदाता कंपनी, क्लीनमॅक्सने आपल्या पहिल्या वहिल्या इनिशिअल पब्लिक ऑफर (आयपीओ) साठी १ रुपया दर्शनी किंमत असलेल्या प्रति इक्विटी शेअरसाठी १,००० रुपये ते १,०५३ रुपये किंमत पट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा इनिशिअल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) सबस्क्रिप्शनसाठी २३ फेब्रुवारी २०२६ रोजी उघडेल आणि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ १,२०० कोटी रुपयांपर्यंतचा फ्रेश इश्यु आणि प्रवर्तक - कुलदीप जैन, बीजीटीएफ वन होल्डिंग्स (डीआयएफसी) लिमिटेड आणि केम्पइंक एलएलपी यांच्याकडून १,९०० कोटी रुपयांपर्यंतच्या ऑफर-फॉर-सेलचा समावेश आहे. विक्री करणारे इतर गुंतवणूकदार - ऑगमेंट इंडिया वन होल्डिंग्स, एलएलसी आणि डीएसडीजी होल्डिंग एपीएस आहेत.

### ब्रिटानिया जिम जॅमने मार्व्हल प्रेरित रोमांचक अशी विशेष श्रेणी केली सादर

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

अभेद्य ढाल, बलवान हातोडे, तीक्ष्ण नखे तसेच क्षणार्धात होणारे जलद पुनरागमन यांमुळे मार्व्हल एंटरटेनमेंटचे सुपरहिरो नेहमीच ॲक्शनच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.या ऊर्जावान विश्वाची अनुभूती हाताशी आणत, ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेडच्या जिम जॅम ब्रँडने मार्व्हल-थीमवर आधारित विशेष आवृत्तीच्या पॅकची घोषणा केली असून, या पॅकमध्ये भव्य कथनाक तसेच प्रभावी पात्रांपासून प्रेरित रचना करण्यात आली आहे.ब्रिटानिया जिम जॅम तसेच ब्रिटानिया जिम जॅम पॉप्समध्ये सादर करण्यात आलेल्या नव्या रेंजमध्ये चाहत्यांचे आवडते सुपरहिरो कॅप्टन अमेरिका, थॉर, आयर्न मॅन, डेडपूल तसेच वूल्व्हरिन यांचा समावेश आहे.प्रत्येक पॅकवर वापरण्यात आलेली आकर्षक ग्राफिक्स आणि लक्षवेधी दृश्यरचना यांमुळे ही उत्पादने मार्वल चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. कॅप्टन अमेरिकेची बलाढ्य ढाल, थॉरचा प्रचंड हातोडा, आयर्न मॅनचा सूट, डेडपूलच्या दोन कटाना तसेच वूल्व्हरिनचे पंजे अशा प्रतीकात्मक घटकांचा समावेश करून स्नॅकिंगच्या अनुभवाला नव्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे.

### क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम चित्रपटाचा प्रीमियर होणार

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

या वर्षाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. मराठी झी५ वर २७ फेब्रुवारी २०२६ रोजी या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित आणि क्षिती जोग व विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांची निर्मिती केलेला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा संवेदनशील सामाजिक विषयावरील चित्रपट आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याचा आनंद, जिद्द, शाश्वतता आणि सांस्कृतिक अभिमान यांचा गौरव या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

### चंदन लेपपासून बनवलेली अगरबत्ती केली लाँच

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

विप्रो कन्स्युमर केअर अँड लाईटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने अगरबत्ती (धूपबत्ती) क्षेत्रात प्रवेश केला असून, संतूर अगरबत्ती लाँच केली आहे, जी खऱ्या चंदनाच्या लेपाचा वापर करून बनवली आहे. या लाँचद्वारे संतूरने घरातील वातावरण सुगंधित करण्याच्या (होम अँबियन्स) क्षेत्रात आपला विस्तार केला असून, चंदनावर आधारित उत्पादनांशी असलेल्या दीर्घकाळच्या विश्वासावर आधारित हा पुढचा टप्पा आहे. संतूर ब्रँड अनेक दशकांपासून आपल्या पर्सनल केअर उत्पादनांमध्ये चंदनाचा वापर करत आले आहे.

### गोल्डन पीकॉक पुरस्कार २०२५ प्रदान

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी क्षेत्रातील प्रतिष्ठित गोल्डन पीकॉक पुरस्कार २०२५ (जीपीएसीएसआर) प्रदान करण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षण, समुदाय विकास आणि सर्वसमावेशक वाढ यासाठी कंपनीने सातत्याने केलेल्या वचनबद्ध प्रयत्नांची ही दखल आहे.गोल्डन पीकॉक पुरस्कारांची स्थापना इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स यांनी केली असून, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, एचआर उत्कृष्टता आणि नवोन्मेषी व्यवस्थापन पद्धती या क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याचा गौरव या पुरस्कारांद्वारे केला जातो. हा पुरस्कार चार्ली जेफरी, कुलगुरू आणि अध्यक्ष, यूनिवर्सिटी ऑफ यॉर्क, यूके यांच्या हस्ते मुंबईतील ताज लँड्स एंड येथे आयोजित २०व्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी परिषदेत प्रदान करण्यात आला.

### जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

'दर्पण' कार आद्यमराठी पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांचे प्रतिमापूजन करून माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

# निरंकारी मिशनचा भव्य गोदावरी स्वच्छता अभियान



**पैठण । वार्ताहर**

जगात नावाजलेल्या संत निरंकारी मिशन आयोजित भव्य गंगा स्वच्छता अभियानात ५०० स्वयंसेवींच्या उपस्थितीत दक्षिण काशी गोदावरी मोक्ष घाट, कृष्ण कमल तीर्थासह वाळवंट परिसरातून जवळपास ५ टन कचरा उचलण्यात आल्याची माहिती मिशनच्या पैठण युनिट तर्फे देण्यात आली आहे. जेंव्हा सेवा ही साधना बनते आणि निसर्गाप्रती संवेदनशीलता हा जीवनाचा मूळ मंत्र होतो, तेव्हा पवित्र संकल्पांचा जन्म होतो. मानवी सेवा आणि लोककल्याणाची हीच दिव्य चेतना साकार करण्यासाठी, संत निरंकारी मिशनद्वारे 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार, दि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०९ ते दुपारी १२ : ०० या वेळेत परम श्रद्धेय सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतात भव्य स्वरूपात आयोजित केला गेला.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री. जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हे विशाल अभियान देशभरात १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी राबविण्यात येईल. या व्यापक विस्तारामुळे हा प्रयत्न ऐतिहासिक ठरेल, जिथे 'स्वच्छ जल' मुळे 'स्वच्छ मन' आणि 'स्वच्छ समाजा'ची निर्मिती शक्य होईल. नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी आणि झरे यांसारख्या नैसर्गिक जलस्त्रोतांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी समर्पित या लोकचळवळीने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण आणि सहभागाचे अद्भुत उदाहरण मांडले आहे. पैठणला भव्य गंगा गोदावरी स्वच्छता अभियान कार्यक्रमासाठी भूषण कश्रवसानकर नगरसेवक बजरंग लिंबोरे, छत्रपती संभाजीनगरचे क्षेत्रीय संचालक विजयजी घोडके वाळूज शाखेचे मुखी शिवाजी कुबड्डेची, मुखी बंडू एखंडेजी जामखेडची मुखी मनोज दादा पालकर पैठणचे मुखी पुंजारामजी कोरडे बद्रीनाथ घाटे शिक्षक महात्मा अविनाश केथा यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, पाचोड,जामखेड, वाळुज, बजाज नगर येथील सेवादल महात्मा मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोक्षघाट व गोदावरी पात्रातील घाण कचरा मोठ्या उत्स्फूर्तपणे साफ करून गोदामाचे पात्र अती स्वच्छ आणि सुंदर असं बनवलेले आहे. संत सेवालाल मठात स्वयंसेवीसाठी लंगर व्यवस्था करण्यात आली होती.

## अंधारी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**अंधारी । वार्ताहर**

अंधारी (ता.सिल्लोड)-हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंधारी येथे उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शिवप्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर तसेच मुख्य चौकात आकर्षक सजावट करण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित भाषणे, पोवाडे व नृत्यनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम व स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले. रक्तदान शिबिर, स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण अशा सामाजिक उपक्रमांनी जयंती उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देण्यात आली. अशा उत्साहपूर्ण वातावरणात अंधारी येथे शिवजयंती मोठ्या थाटामाटात संपन्न झाली.

## नादरपुर शिवारात बिबट्याचा वावर

### घटनेचा सी.सी.टि.व्ही.मध्ये थरारक क्षण कैद; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन




**कन्नड । वार्ताहर**

तालुक्यातील शिवारातील नादरपुर गट क्रमांक १६९ येथे बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील शेतकरी पांडुरंग कोंडू निकम दादाराव दत्तू निकम यांच्या पाळीव कुत्र्यावर वन्यप्राणी बिबट्याने हल्ला करून ठार केल्याची घटना खूप वेळेस झाली दि. २१ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास घडली. ही संपूर्ण घटना शेतामध्ये लावलेल्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

पहाटेच्या शांत वातावरणात बिबट्याने गोठ्याच्या परिसरात प्रवेश करून घातल्याचे स्पष्टपणे चित्रीकरणात दिसून येते. सकाळी ही घटना निदर्शनास येताच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. नादरपूर येथील शेतकरी दादाराव दत्तू निकम यांच्या शेतामध्ये असलेल्या जनावरांच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे असल्यामुळे निदर्शनात आली व घटनेची माहिती दिली. वनरक्षक अनिल इंगळे व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळाची माहिती कळवली यावेळी शेतकरी व नागरिकांना घाबरून न जाता काळजी घेण्याचे, रात्रीच्या वेळी सतर्क राहण्याचे, तसेच गोठे व घरांच्या परिसरात प्रकाश व्यवस्था ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. बिबट्याच्या संभाव्य वावरामुळे नागरिकांनी रात्री एकटे फिरणे टाळावे, लहान जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत आणि संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित प्रशासनास कळवावे.

## हवामान बदलाचा आरोग्यावर गंभीर परिणाम



**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

वातावरणातील झपाट्याने होणारे बदल, वाढते तापमान, वाढते प्रदूषण आणि उष्णतेच्या लाटा यांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे मेडिकवर हॉस्पिटलच्या तज्ञांनी स्पष्ट केले. हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा विषय नसून तो सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे, असे त्यांनी सांगितले.

**शरीरावर होणारे प्रमुख परिणाम-**ताप, सर्दी, खोकला, उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारख्या समस्या वाढताना दिसत आहेत. वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी चक्कर येणे, थकवा, रक्तदाब कमी होणे आणि गंभीर अवस्थेत उष्माघाताचा धोका निर्माण होतो.

**श्वसनाचे वाढते आजार-** प्रदूषण आणि धुळीचे प्रमाण वाढल्याने दमा, ॲलर्जी आणि ब्रॉन्कायटिस यांसारखे श्वसनाचे आजार वाढत आहेत. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक अधिक संवेदनशील असल्याचे तज्ञांनी नमूद केले.

**हृदयविकाराचा वाढता धोका-**उष्णतेमुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे हृदयविकाराच्या झटक्यांची शक्यता वाढू शकते, असा इशाराही डॉक्टरांनी दिला.

**प्रतिबंधात्मक उपाय-** आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी खालील उपाय महत्त्वाचे असल्याचे तज्ञांनी सांगितले: पुरेसे पाणी पिणे व हलका आहार घेणे, दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे, मास्कचा वापर करून प्रदूषणापासून संरक्षण करणे, नियमित आरोग्य तपासणी करणे, या पत्रकार परिषदेत डॉ.समिध पटेल, डॉ.आनंद देशमुख, डॉ.प्रसन्न देशमुख, डॉ.आनंददीप अग्रवाल व डॉ.अविनाश कचरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच उपलब्ध आरोग्य सुविधांबाबत सेंटर हेड डॉ.विशाल कुटे यांनी सविस्तर माहिती दिली. नागरिकांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर स्वतःची आणि कुटुंबियांची काळजी घेणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.



छाया-मंगेश सोहनी, सोयगांव

**सोयगाव-शहरात सोयगाव व्यापारी महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना मंगेश सोहनी, संजय कासार, रमेश वामने पाटील आदींसह उपस्थित होते.**

## एलजीई इंडिया ने त्यांचे तिसरे तिमाही आर्थिक वर्ष २६ चा निकाल केला जाहीर

### बाजारातील आपले अग्रस्थान कायम राखत निर्यातीवर भर देण्याची केली तयारी

**छत्रपती संभाजीनगर । वार्ताहर**

भारतातील आघाडीचा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड असलेल्या एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड (एलजीई इंडिया) ने आज आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ४१.१४ अब्ज रुपयांचा महसूल मिळवला, जो आर्थिक वर्ष २५ च्या तिसऱ्या तिमाहीत ४३.९६ अब्ज रुपयांचा होता आणि आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत ४.८% इबीआयटीडीए मार्जिन होता. सणासुदीनंतरच्या काळात अपेक्षेपेक्षा कमी मागणी असूनही, एलजीई इंडियाने होम अप्लायन्सेस आणि होम एंटरटेनमेंट विभागांसह प्रमुख श्रेणींमध्ये आपले बाजारातील अग्रस्थान कायम राखले आहे. यावरून कंपनीची मूळ ब्रँड ताकद आणि ग्राहकांचा विश्वास सिद्ध होतो.

निकालांवर प्रकाश टाकताना, एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी हाँग जू जिओन म्हणाले, बाह्य घटकांमुळे गेल्या तिमाहीत मंदी असूनही, एलजीई इंडियाने प्रमुख बीटूसी विभागांमध्ये पहिले स्थान कायम ठेवले आहे. मजबूत मूलभूत तत्त्वे, नावीन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित करणे आणि दीर्घकालीन स्थिरतेवर लक्ष केंद्रित करून, आम्ही आमच्या नवीन बीईई-रेटेड पोर्टफोलिओला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे नवीन ताकदीने तिमाहीत प्रवेश केला आहे. उन्हाळा जवळ येत असताना, आम्ही आमच्या दोन-ट्रॅक धोरणाद्वारे कॉम्प्रेसर उत्पादनांची मागणी मिळवण्यासाठी सज्ज आहोत - प्रीमियम आणि 'एलजी इसेन्शियल' लाइनअपचा विस्तार करणे. आम्ही आमच्या उच्च-मार्जिन एएमसी व्यवसायाचे स्केलिंग आणि बीटूबी पायाभूत सुविधांच्या संधींचा फायदा घेण्यासाठी वचनबद्ध आहोत. यूएस टॅरिफचे तर्कसंगतीकरण 'मेक इंडिया ग्लोबल' या आमच्या वचनबद्धतेला आणखी गती देण्यास मदत करेल, कारण आम्ही देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि निर्यात वाढविण्यासाठी उत्पादन ऑप्टिमाइझ करतो. या घडामोडी ग्राहकांना आणि भागधारकांना समान मूल्य प्रदान करण्याच्या आमच्या क्षमतेवर अधोरेखित करतात आणि आम्हाला आमच्या दीर्घकालीन मार्गावर विश्वास आहे.

**निर्यातीवर वाढलेले लक्ष**

भविष्यात, अमेरिकेतील शुल्कात झालेली कपात आणि युरोपीय संघासोबतचा मुक्त व्यापार यामुळे निर्यातीच्या संधी वाढण्याची अपेक्षा आहे. पुढील आर्थिक वर्षात, 'मेक इन इंडिया' अंतर्गत बनवलेल्या प्रीमियम उत्पादनांच्या जोरावर निर्यात दुप्पट करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये अमेरिका आणि युरोपचा समावेश असेल. विशेषतः भारतासाठी, एलजीच्या प्रीमियम पोर्टफोलिओचा विस्तार करून दोन-मार्गी धोरणावर लक्ष केंद्रित केले जाईल आणि त्याचबरोबर पहिल्यांदाच घरगुती उपकरणे खरेदी करणाऱ्यांसाठी डिझाइन केलेली एलजी इसेन्शियल लाइन अप मजबूत केली जाईल. त्याचप्रमाणे, श्री सिटीमधील तिसऱ्या प्लांटच्या कार्यान्विततेद्वारे एलजीई इंडियाच्या उत्पादन बेसचा विस्तार करण्यावर सतत लक्ष केंद्रित केले जाईल, तसेच आमच्या उत्पादन परिसंस्थेमध्ये स्थानिकीकरण वाढवले जाईल. भारताबाबत विशेष सांगायचे तर, एलजीच्या प्रीमियम पोर्टफोलिओचा विस्तार करणे आणि त्याच वेळी पहिल्यांदाच होम अप्लायन्सेस खरेदी करणाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेली 'एलजी एसेन्शियल' श्रेणी मजबूत करणे, अशा 'टू-ट्रॅक स्ट्रॅटेजी'वर (द्विस्तरीय धोरण) लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, श्री. सिटी येथील तिसरा प्रकल्प कार्यान्वित करून एलजीई इंडिया चा उत्पादन विस्तार वाढवण्यावर आणि उत्पादन परिसंस्थेमध्ये स्थानिकीकरणाला चालना देण्यावर सतत भर दिला जाईल.

## महिलांच्या पुढाकारातून गांडूळ सेंद्रिय खत निर्मिती




**रहिमाबाद । वार्ताहर**

महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा अबला असला तरी सर्वच क्षेत्रात आर्थिक सक्षमीकरण करण्याची क्षमता आहे. हे सिद्ध करण्याचे उदाहरण तालुका सिल्लोड येथील गाव नटवी तालुका सिल्लोड येथील स्वयम् शिक्षण. प्रयोग संस्थेच्या सदस्याने सिद्ध करून दाखवले. राज्याच्या कृषी विभागाच्या संकल्पनेतून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या शेतकरी महिला गटाच्या माध्यमातून नटवी गावात वेगवेगळ्या ठिकाणी गांडूळ खत निर्मिती प्रकल्प तयार करून या गटाच्या महिलांनी पुरुषांच्या तुलनेत आपण कुठेही मागे नाही हे सिद्ध करून दाखवले पर्यवेशिका व सखी कोमल दत्ता काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील ५० महिलांनी आजवर विविध प्रयोग राबवले आहे.

चूल व मूल यावर मर्यादित न राहता संसाराचा गाडा हकण्यासाठी स्वावलंबनाच्या दिशेने सुरू केलेली घोडदौड वाखण्याजोगी आहे. गांडूळ खत निर्मिती ची संकल्पना राबवताना प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे. तालुका समन्वयक अर्चना कोळी वैशाली घुगे. पुष्पा तुपे शुभम कुमावत इत्यादी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शना खाली आखणी करून प्रकल्प साठी केलेली मेहनत नजरेत भरणारी आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी निर्मला खेळवणे. कल्पना बर्डे, शितल मोडेकर, कीर्ती मोडेकर, वर्षा बोर्डे यांनी अथक परिश्रम घेतले.

# आ.बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

## शेतकऱ्यांना मुबलक वीज मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार–आ.लोणीकर



**जालना । वार्ताहर**

शेतीसाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. सिंचनासाठी मोटार पंप, विहिरी, बोअरवेल यांसारखी साधने पूर्णपणे वीजेवर अवलंबून असल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ही बाब लक्षात घेऊन आमदार लोणीकर यांनी या प्रश्नाला प्राधान्य देत सातत्याने पाठपुरावा केला. त्या पाठपुराव्याला यश आले असून परतूर विधानसभा मतदारसंघातील लोणी सातोना वरफळ कोकाटे हादगाव वाढोणा पांगरी गोसावी केंधळी नेर सेवली येथील ते ३३ केव्ही सह मतदार संघातील सर्वच ठिकाणी क्षमता वाढ केली जाणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर लोणी येथे ३३ केव्ही क्षमतेचा नवीन १० एमव्हीए ट्रान्सफार्मर मंजूर करण्यात आला आहे. यापूर्वी येथे केवळ एकच ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफार्मर कार्यरत होता. नव्या ट्रान्सफार्मरमुळे क्षमतेत दुपटीने वाढ होणार असून वीजपुरवठा अधिक सक्षम, स्थिर आणि सातत्यपूर्ण होणार आहे. तसेच लोणी (१कोटी ५० लक्ष रु), सातोना (१ कोटी ५० लक्ष रु) वरफळ (१कोटी५० लक्ष रु), सातोना (१कोटी ५० लक्ष रु) कोकाटे हदगाव (१ कोटी ५० लक्ष) वाढोणा (१ कोटी ५० लक्ष) पांगरी गोसावी (१ कोटी ५० लक्ष रु) केंधळी (१ कोटी ५० लक्ष) नेर (१ कोटी ५० लक्ष) सेवली (१ कोटी ५० लक्ष) अशा एकूण १३ कोटी ५० लक्ष किमतीच्या उपकेंद्रातील या भागांसाठी नवीन ट्रान्सफार्मर मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे वीज वितरण व्यवस्थेत मोठा सुधार होणार असून वारंवार होणारे लो–व्होल्टेज, ट्रिपिंग आणि वीज खंडित होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.

सर्वच ३३ केव्ही परिसरातील गावांमध्ये शेतकऱ्यांना एक दिवसाआड थ्री फेज वीज मिळत असल्यामुळे शेतीच्या कामांमध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने उत्पादनावर परिणाम होत होता. मात्र आता हा प्रश्न मार्गी लागण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांना नियमित आणि सुरळीत थ्री फेज वीजपुरवठा मिळणार आहे, अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. यापूर्वीच ३७ कोटी रुपयांच्या निधीतून ३३ केव्ही क्षमतेत वाढ करण्यात आली असून पेवा येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्रालाही मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या सर्व कामांमुळे संपूर्ण परिसरातील वीज वितरण यंत्रणा अधिक मजबूत होत आहे. ३३ केव्ही क्षमतेत वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक महत्त्वाचे फायदे मिळणार आहेत. वीजपुरवठा अधिक सतत आणि स्थिर होणार असल्याने खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल. लो–व्होल्टेजची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊन मोटार आणि पंप पूर्ण क्षमतेने चालतील. त्यामुळे सिंचन वेळेवर होऊन पिकांचे नुकसान टळेल आणि उत्पादनात वाढ होईल. तसेच व्होल्टेज चढ–उतार कमी झाल्यामुळे मोटार जळणे किंवा उपकरणे खराब होण्याचे प्रकार कमी होतील, त्यामुळे शेतकऱ्यांचा दुरुस्ती



खर्चही कमी होईल. लाइनवरील ओव्हरलोड कमी झाल्यामुळे ट्रिपिंग आणि फॉल्ट कमी होतील. वाढीव क्षमतेमुळे अधिक वेळ वीज उपलब्ध होणार असून एक दिवसाआड वीज देण्याची गरज कमी होईल. याशिवाय नवीन कृषी वीज जोडण्या देणे सोपे होणार असून भविष्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. याचा थेट परिणाम शेती उत्पादन, उत्पन्न आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यावर होणार आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रश्न मार्गी लागला असून परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर पुढील आठवड्यात या प्रकल्पांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सर्व निर्णयांमुळे शेतकऱ्यांचा विजेचा दीर्घकालीन प्रश्न सुटण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असून शेतीला नवी ऊर्जा मिळणार आहे. परिणामी उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि आर्थिक प्रगतीचा मार्ग मोकळा होणार असल्याने हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक ठरत आहे.

## पंजाबराव तौर यांना पितृशोक

**कुंभार पिंपळगाव । वार्ताहर**

घनसावंगी तालुक्यातील शिवणगाव येथील प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक शिवाजीराव रंगराव तौर वय वर्ष (९१) यांचे ता.२१ फेब्रुवारी शनिवार रोजी सायंकाळी ५ वाजता संभाजीनगर येथे दुःखद निधन झाले. ता.२२ रविवार रोजी दुपारी २ वाजता त्यांच्या मूळ गावी शिवणगाव येथील स्मशानभुमी येथे त्यांच्या पार्थितवावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुल, दोन मुली, सुनबाई, जावाई, नातवंडे, एक भाऊ, भावजया, पुतणे, पूतनसुना तिन बहिणी, मेहुणे असा मोठा परिवार आहे.

पंचक्रोशीत सर्वांच्या परिचित शांत, शिस्त, नियोजन व शेती प्रिय, दुरदृष्टी,मनमिळाऊ स्वभावाचे असे शिवाजीराव अबा यांच्या अंत्यसंस्कारासाठी त्यांचे जवळचे स्नेही माजी. मंत्री राजेश भैया टोपे,



रमेश काका पैठणे , सतिष भाऊ टोपे, पंकज नाना बोराडे,कल्याणराव तौर सह प्रतिष्ठीत नागरिक , डॉक्टर, वकील, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, सरकारी,निमसरकारी विविध क्षेत्रातील पदाधिकारीही, सामाजिक, राजकिय, पत्रकार, भाऊबंद, पाहुणे, सहकारी मित्र नातेवाईक अशा बहुसंख्येने परिवाराची या वेळी उपस्थिती होती. माजी सरपंच अशोकदादा तौर यांचे काका तर राजु अप्पा तौर, पंजाब दादा तौर यांचे ते वडील होत.

## ...अखेर भोकरदन बसस्थानक परिसरात पोलीस चौकी स्थापन

**भोकरदन । वार्ताहर**

शहरातील शाळा व महाविद्यालय परिसर तसेच बसस्थानकात टवाळखोरांमुळे विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे याचा बंदोबस्त करण्यासाठी बसस्थानक परिसरात तात्काळ पोलीस चौकीची स्थापना करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सौ.अनिताताई जाधव यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल व पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्याकडे केली होती. त्याची तात्काळ दखल घेण्यात आली असून रविवारी २२ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष पोलीस चौकी स्थापन करण्यात आल्याने सौ जाधव यांच्या मागणीला यश मिळाले आहे. दरम्यान, सौ.अनिताताई जाधव यांनी पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक व दामिनी पथक तसेच संपूर्ण पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहे.

शहरात काही दिवसापूर्वी शालेय मुलीची छेड काढण्याचे प्रकरण घडल्यानंतर भोकरदन शहरात दामिनी पथकाची स्थापना करून मुलींना संरक्षण देण्यात यावे व बसस्थानक परिसरात पोलीस चौकीची स्थापना करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अनिताताई जाधव यांनी केली होती.त्या संदर्भातील विविध वर्तमानपत्रात बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या.आणि त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार जालना येथील दामिनी पथक भोकरदन मध्ये दाखल होऊन पथकाने तक्रारदार सौ.अनिताताई जाधव यांना सोबत घेत शहरातील न्यू हायस्कूल गाठत तेथे विद्यार्थिनींची बैठक घेऊन त्यांचे समोपदेशन करताना टवाळखोर मुलांवर कठोर कार्यवाही करणार असल्याचे सांगितले होते.

दरम्यान, प्रथम पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक किरण बिडवे व दामिनी पथकाने सौ अनिताताई जाधव यांच्यासोबत टवाळखोर व त्यावरील कारवाई बाबत चर्चा केली होती तेव्हाच सौ जाधव यांनी बसस्थानक परिसरात पोलीस चौकीची मागणी केली होती. मागणीची दखल घेऊन पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनीही वरिष्ठ स्थरावर पाठपुरावा करून पोलीस चौकी मंजूर करून घेतली. दरम्यान, रविवारी २२






### सौ.अनिताताई जाधव यांच्या मागणीला यश

फेब्रुवारी रोजी दुपारी बसस्थानक परिसरात पोलीस मदत केंद्र स्थापनही झाले आहे. भोकरदन शहरात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी मोठया प्रमाणात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी विविध शाळा व महाविद्यालयात दररोज येत असतात. शाळा व महाविद्यालय सुरु होण्याच्या व सुट्टीच्या वेळी विद्यार्थिनींचा पाठलाग करून छेड काढण्याच्या घटना शहरात घडत असून अशा घटनामुळे मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण होत आहे. तर काही मुली अशा घटनामुळे व्यथित होऊन शिक्षण सोडण्याच्या मानसिकतेत असून पालकांतूनही याबाबत नाराजीचा सूर उमटत होता. आपल्या मुलींना शिक्षणासाठी पाठवावे की नाही या विवंचनेत बरेच पालक असल्याचे दिसून येत असल्याचे शाळेतील शिक्षक ही सांगत होते हे विशेष.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम उत्साहात साजरी

### शिवरायांचे स्मरण केल्यास आत्मविश्वास निर्माण होतो–आ.अर्जुन खोतकर



**जालना । वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्तात भिती नावाच्या पेशी नव्हत्या त्यामुळे ते प्रत्येक काम कुठल्याही भीतीविना करत असत. शिवरायांचे स्मरण केल्यास आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे प्रतिपादन आ. अर्जुन खोतकर यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी जालना येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य कर्तृत्व व शौर्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जालना येथे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी श्री. खोतकर बोलत होते. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल उपजिल्हाधिकारी रोहयो मनिषा दांडगे, उप विभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार जालना छाया पवार, अतिरिक्त आयुक्त जालना शहर महानगरपालिका अर्जुन गिराम, उपायुक्त जालना शहर महानगरपालिका नंदा गायकवाड, तहसीलदार बदनापूर अतुल बने यांची उपस्थिती होती. खोतकर पुढे म्हणाले की, स्वराज्य म्हणजे सत्ता नव्हे, स्वाभिमान आहे हे शिवरायांनी आपल्या कार्यशैलीतून दाखवून दिले. शिवाजी महाराजांनी त्या काळी लोकाभिमुख प्रशासनाची निर्मिती करुन गुड गव्हर्नस चा पाया रचला होता. शिवरायांनी शिस्तबद्ध, जलद व गतीमान प्रशासनाचा पाया रचला. शिवरायांची चिकीत्सकवृत्ती, निरीक्षण क्षमता, उत्कृष्ट कौशल्य, उत्तम अर्थतज्ञ यासह अन्य व्यक्तीमत्त्व विकसनाचे पैलू, उत्कृष्ट युद्धनिती, आधुनिक विचार सरणी हे त्यांचे वाखाणण्याजोगे गुण होते. आज शाहीर रामानंद उगले यांनी शिवजन्माचा पोवाडा, माता जिजाऊने शिवरायांना कसे घडवले याबाबतचा पोवाडा, अफजलखानाचा वधाचा पोवाडा, दोनच राजे इथे गाजले, गाडी गुंगराची हे पोवाडेचे बहारदार सादरीकरण केले. यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी या कार्यक्रमास प्रतिसाद दिला.

## घरकुल ही मूलभूत गरज-ॲड.भास्कर मगरे

**परतुर । वार्ताहर**

शिवसेना दलित आघाडीच्या वतीने गेले अनेक वर्षापासून भूमिहीन,बेघर,निराधार या त्रिसूत्री कार्यक्रमाची जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष आणि जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियान गाव,वाडी –तांडावस्तीमध्ये जाऊन विहित नमुन्यात उपेक्षित समाजातील वंचित घटकाचा शोध घेऊन त्याला शासकीय योजनेचा लाभ देण्यात शिवसेना दलित आघाडीला यश आलेले असल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी सांगितले.

परतुर येथील भूमिहीन, बेघर, निराधार त्रिसूत्री कार्यक्रम मेळाव्याप्रसंगी शिवसेना दलित आघाडी जालना जिल्हाप्रमुख ॲड.भास्कर मगरे बोलताना म्हणाले. यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करुन त्यांना निवेदन देण्यात आले. शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना जिल्ह्यात तालुका निहाय, तालुकास्तरीय भूमीहिन, बेघर, निराधार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. आज १८ फेब्रुवारी रोजी परतुर येथील भूमीहिन, बेघर निराधार मेळाव्यात ॲड. भास्कर मगरे यांनी मार्गदर्शन केले. शिवसेना दलित आघाडीच्या वतीने राबविले जाणारे जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियान जिल्ह्यातील गाव वाडी तांडा वस्तीमध्ये जाऊन उपेक्षित समाजातील वंचित घटकातील लाभार्थी शोधून त्याला घरकुल आणि निराधाराचे मासिक देय अनुदान मंजूर करून मिळवून देण्यात आले आहे.

## सुटीच्या दिवशीही ‘गुरुजीं’ चा हाती खराटा

### संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त भोकरदनमध्ये स्वच्छता अभियान



**भोकरदन । वार्ताहर**

स्वच्छता हीच ईश्वर सेवा हा संदेश केवळ पुस्तकात न ठेवता तो कृतीत उतरवण्याचे काम भोकरदन येथील महिला शिक्षिकांनी केले आहे. निमित्त होते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे. रविवारी सुटीचा दिवस असतानाही घरातील कामांना बाजूला सारून या शिक्षिकांनी भोकरदन येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय परिसरात हातात खराटा घेत स्वच्छतेचा जागर केला.

**स्वच्छतेतून गाडगेबाबांना आगळीवेगळी आदरांजली**

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर हातात खराटा घेऊन समाजातील घाण आणि अज्ञान दूर करण्याचे काम केले. त्यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत भोकरदन येथील श्रीम . जिजा वाघ, श्रीम . चारूशिला इंगळे, श्रीम .ललिता पाटील आणि श्रीम पालकर, श्रीम. स्वाती चित्ते, श्रीम. सुप्रिया देशमुख या महिला शिक्षिकांनी एकत्र येऊन गटशिक्षणाधिकारी कार्यालय परिसराची साफसफाई करण्याचा निर्णय घेतला. साधारणपणे रविवारी सरकारी कार्यालये बंद असतात आणि कर्मचारी सुटीचा आनंद घेतात. मात्र, या शिक्षिकांनी सकाळीच कार्यालयात जमून झाडे–झुडपे, प्लास्टिकचा कचरा आणि साचलेली धूळ साफ केली.

**महिला शिक्षिकांचा पुढाकार; नागरिकांकडून कौतुक**

या मोहिमेमध्ये शिक्षिकांनी केवळ परिसर झाडून काढला नाही, तर साचलेल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाटही लावली. त्यांच्या या उपक्रमामुळे कार्यालयीन परिसराचा चेहरामोहरा बदलून गेला आहे.शिक्षक हा समाजाचा आरसा असतो. आपण जर स्वतः कृती केली, तरच समाज आणि विद्यार्थ्यांवर त्याचे चांगले संस्कार होतील. गाडगेबाबांची जयंती साजरी करण्याची हीच सर्वोत्तम पद्धत आम्हाला वाटली.– सौ जिजा वाघ महिला शिक्षिका

**महत्त्वाची वैशिष्ट्ये:** निमित्त: राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती. ठिकाण: गटशिक्षणाधिकारी कार्यालय परिसर, भोकरदन. सहभाग: श्रीम.. जिजा वाघ, श्रीम . चारूशिला इंगळे, श्रीमती . ललिता पाटील, सौ. सुमन पालकर, श्रीम.सुप्रिया देशमुख, श्रीम. स्वाती चित्ते, संदेश: सुटीच्या दिवशी श्रमदान करून स्वच्छतेचा संदेश. या स्तुत्य उपक्रमाचे भोकरदन शहरात मोठ्या प्रमाणावर कौतुक होत असून, आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठच या महिलांनी घालून दिला आहे.

## पायोनियर सीबीएसई स्कूल, भोकरदन येथे ‘ह्युमन कॅल्क्युलेटर’ गौरव भंडारी यांची गणित कार्यशाळा



**भोकरदन । वार्ताहर**

पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल, भोकरदन येथे जगप्रसिद्ध ‘ह्युमन कॅल्क्युलेटर’ म्हणून ओळखले जाणारे आणि गिनीज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये तब्बल ६ वेळा नोंद असलेले गौरव भंडारी यांनी विशेष गणित कार्यशाळा आयोजित केली. ही कार्यशाळा अत्यंत यशस्वी ठरली असून विद्यार्थ्यांसाठी ती एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरली. या कार्यशाळेमध्ये भंडारी यांनी वेगवान गणिती गणना, मानसिक गणित (मेंटल मॅथ्स), एकाग्रता वाढविण्याचे तंत्र, तसेच गणितातील भीती दूर करण्यासाठी सोप्या आणि रंजक पद्धती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगितल्या. त्यांच्या विलक्षण गणनाशक्तीचे प्रात्यक्षिक पाहून विद्यार्थी आणि शिक्षक भारावून गेले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. कठीण वाटणारे गणित सोपे, आनंददायी आणि खेळकर पद्धतीने कसे शिकता येते, याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास तसेच गणिताविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास निश्चितच मदत झाली. शाळेच्या व्यवस्थापनाने अशा दर्जेदार आणि प्रेरणादायी उपक्रमांच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यशाळा भविष्यातही आयोजित करण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. एकूणच, पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल, भोकरदन येथे आयोजित ही गणित कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि अत्यंत यशस्वी ठरली.

# आ.सुरेश धस यांच्या मागणीनंतर 'मिशन जरेवाडी' आढावा मोहिमेला वेग

## गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडून ग्रामीण भागात शाळांचे तपासणी दौरे सुरू



**पाटोदा । वार्ताहर**

पाटोदा तालुक्यातील प्राथमिक शिक्षणात परिवर्तन घडवणाऱ्या 'मिशन जरेवाडी' पॅटर्नच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आमदार सुरेश धस यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत ठोस मागणी केली होती. त्या मागणीनंतर शिक्षण विभागाने तालुक्यात 'मिशन जरेवाडी'चा सखोल आढावा घेण्यास सुरुवात केली असून प्राथमिक शाळांचे दौरे आणि अध्यापन कार्यपद्धतीची प्रत्यक्ष पडताळणी सुरू झाली आहे.

जानेवारी २०२५ मध्ये सुरू झालेल्या या पॅटर्नने अल्पावधीतच उल्लेखनीय यश मिळवले होते. २३ पर्यवेक्षकांनी २३४ शाळा भेटी देत अध्यापनात सुधारणा घडवून आणली. 'निपुण भारत' अंतर्गत ४९० शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आणि एप्रिल २०२५ पर्यंत ७५०८ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुमारे १० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. शिष्यवृत्ती परीक्षेत ३४ विद्यार्थी पात्र ठरले; जरेवाडीच्या दुर्गम शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून तालुक्याचा लौकिक वाढवला.

मात्र सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या १११ शिक्षक बदल्यांनंतर मागील काही कालावधीत गुणवत्तावाढीचा वेग मंदावल्याचे चित्र समोर आले. ही बाब गांभीर्याने घेत आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांच्यासोबत झालेल्या बैठकीत 'मिशन जरेवाडी'ची अंमलबजावणी पुन्हा प्रभावीपणे रुळावर आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

त्याच अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे दौरे सुरू केले असून 'मिशन जरेवाडी' व 'निपुण भारत' अंतर्गत अध्यापन कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला जात आहे. एक महिन्याच्या आत संपूर्ण स्थितीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व शिक्षकांना पॅटर्नची सुसंगत अंमलबजावणी करता यावी यासाठी लवकरच विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याची तयारी सुरू आहे.'मिशन जरेवाडी' हा केवळ उपक्रम नसून पाटोदा तालुक्याच्या शैक्षणिक उन्नतीचा पाया आहे; गुणवत्तावाढीत कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका आमदार सुरेश धस यांनी बैठकीत मांडली होती. त्यांच्या या मागणीनंतर प्रशासन सक्रिय झाल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

# गेवराई नगरपरिषद महोत्सवामध्ये द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूलचा विजय



**गेवराई । वार्ताहर**

गेवराई नगरपरिषद आयोजित महोत्सव २०२६ अंतर्गत आंतरशालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. हा महोत्सव नगराध्यक्षा सौ.गिताभाभी बाळराजे पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. मुख्यधिकारी विक्रम मांडुरके यांच्या प्रमुख नियोजनबद्ध पद्धतीने महोत्सव उत्साहात पार पाडला.गेवराई नगरपरिषद आयोजित महोत्सव २०२६ अंतर्गत आंतरशालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या बक्षिस वितरण सोहळयात नरगराध्यक्ष गिताभाभी पवार,उपनगराध्यक्ष घुंबार्डे,लोकनेते बाळराजे पवार,मा.सभापती युध्दाजीत पंडीत,मुख्याधिकारी विक्रम मांडुरके,नायब तहसीलदार संजय सोनवणे,सभापती,राजेंद्र राक्षसभुवनकर,मा.नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ,व सर्व नगरसेवक, पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

या महोत्सवात द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १४ व १७ वर्षांखालील मुले-मुली गटात सांघिक व वैयक्तिक प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली.सांघिक क्रीडा प्रकारात शाळेने दैदिप्यमान यश संपादन केले. शोभायात्रेत तृतीय पारितोषिक मिळाले. १४ वर्षांखालील मुलांनी रस्सीखेच स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला, तर मुलींनी रस्सीखेच व खो-खो या दोन्ही प्रकारांत द्वितीय क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील मुलांनी खो-खो व रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विजेतेपद पटकावले, तसेच रस्सीखेचमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. समूह नृत्य मध्ये माध्यमिक गटाने द्वितीय, तर प्राथमिक गटाने तृतीय पारितोषिक मिळवले. वैयक्तिक क्रीडा प्रकारातही विद्यार्थ्यांनी चमकदार यश संपादन केले. १४ वर्षांखालील मुली गटात प्राची राऊत हिने बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. १४ वर्षांखालील मुलांमध्ये शिवतेज औटे याने बुद्धिबळात द्वितीय क्रमांक मिळवला, तर १७ वर्षांखालील मुलांमध्ये रणवीर सोळुंके याने बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.सांस्कृतिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. चित्रकला स्पर्धेत माध्यमिक गटातील आराध्या चव्हाण हिने द्वितीय, तर प्राथमिक गटातील ओवी वावरे हिने तृतीय क्रमांक मिळवला. वक्तृत्व स्पर्धेत माध्यमिक गटातील नेहा मस्के व प्राथमिक गटातील तृप्ती नरवडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. रांगोळी स्पर्धेत सानीका आखरे हिने प्रथम क्रमांक मिळवत शाळेचा मान उंचावला.या सर्व विजेत्या खेळाडू, स्पर्धक व मार्गदर्शक शिक्षकांचे शाळेच्या संचालिका डॉ. वर्षा मोटे, प्राचार्य प्रमोद सर तसेच पालकांकडून सर्व स्तरांतून कौतुक होत

# पुष्कर येथे वेदमूर्ती अथर्व जोशी यांचे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे घनपारायण संपन्न

**बीड । वार्ताहर**

राजस्थानमधील पवित्र तीर्थक्षेत्र पुष्कर येथे वेदमूर्ती अथर्व जोशी यांनी शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे अत्यंत दुर्मिळ आणि कठीण असे वेदघनपारायण यशस्वीरीत्या पूर्ण करून वैदिक परंपरेचा मान उंचावला आहे. अत्यंत कठोर साधना, अचूक स्वरसंयोजन आणि परंपरेप्रती अखंड निष्ठा यांची कसोटी पाहणारे हे घनपारायण मोजक्या वेदपाठींनाच साध्य होते. या उल्लेखनीय कार्यामुळे वैदिक अध्ययन-परंपरेत एक महत्त्वपूर्ण टप्पा नोंदवला गेला आहे.



घनपारायण पूर्णत्वास गेल्यानंतर या कार्याचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, पूज्य स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज तसेच रामदेव महाराज यांच्या हस्ते वेदमूर्ती अथर्व जोशी यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे, संयमशील साधनेचे आणि वैदिक परंपरेबद्दलच्या समर्पणाचे विशेष कौतुक केले.

दरम्यान, पुष्करक्षेत्रात त्यांच्या आगमनावेळी घनपारायणाचा प्रारंभिक मंत्रोच्चार करून त्यांचे स्वागत करण्यात आले. वेदमूर्ती संतोष दुशी, गजानन जोतकर, घनश्याम महाराज, जीवन गुरुजी आदी विद्वान व मान्यवरांनी त्यांचा विशेष सत्कार केला. या वेळी उपस्थित भाविक व वेदप्रेमींनी वैदिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी अशा कार्यांची गरज अधोरेखित केली.

वेदमूर्ती अथर्व जोशी हे बीड जिल्ह्याचे भूषण मानले जात असून त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्याची कीर्ती उंचावली आहे. आजच्या आधुनिक युगात वैदिक परंपरेचे सातत्य राखणे ही मोठी जबाबदारी असताना, त्यांनी घनपारायणासारखे कठीण व्रत पूर्ण करून नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कार्यामुळे वैदिक अध्ययनाबद्दल समाजात नवचैतन्य निर्माण होईल, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

# श्री सिद्धेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभ

**माजलगाव । वार्ताहर**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ वी जयंती येथील श्री सिद्धेश्र्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत भानप (माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष), प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार कमलेश जाब्रस, प्रमुख वक्ते श्रीमती आशालता करपुडे, तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख अमोल ठाकुर, सहसंमेलन प्रमुख रामकृष्ण फुलझळके इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शिबिर गीत, छत्रपती शिवाजी महाराज व पंचपरिवर्तन यांचे पूजन करुन झाले. यानंतर कला विभागाच्या वतीने दिला जाणारा स्व. आशा भावसार पुरस्कार चि. सर्वेश संदीप गिल्डा व कु. मधुरा संभाजी राऊत या विद्यार्थ्यांना देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच प्रतिवर्षी साकार होणारा 'संगणकांचे अंतरंग' व 'चित्रमंजिरी' अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मातृ मंदिर विश्र्वस्त संस्था निगडी पुणे आयोजित समुह गीत गायन स्पर्धेत व पोवाडा गायन स्पर्धेत प्राप्त झालेल्या बक्षीसाचे वितरण करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथी कमलेश जाब्रस यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला तसेच विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनानिमीत्त आयोजित स्पर्धेत बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख वक्त्या श्रीमती आशालता करपुडे यांनी हिंदवी स्वराज्याची पार्श्र्वभूमी, इतिहास तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची नेतृत्व याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रशांत भानप यांनी केले, प्रास्ताविक श्रीमती रोहिणी वाघीले यांनी केले. बक्षीसाचे वाचन रोहित खिंडरे व श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी केले.आभार श्रीमती सारिका मुंडे व सुत्रसंचलन वरिष्ठ लिपिक श्रीकांत भुसारे यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली. शांती मंत्र मंगेश मुळी यांनी सांगितला. शिबिर गीत चैतन्य आहेर व संगीत विभागाच्या चमुने सादर केले. यावेळी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर, परमेश्र्वर आदमाने सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊसतोड कामगारांची ओळख पुसण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा-खा.बजरंग सोनवणे

**पाटोदा । वार्ताहर**

बीड जिल्ह्याची ऊसतोड कामगारांची ओळख पुसून टाकण्यासाठी माता-भगिनींनी उद्योगात पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, डोंगरकिन्ही येथे 'उमेद' (दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान) अंतर्गत बँक कर्ज मंजुरी पत्र व कर्ज वितरणाचा भव्य मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे प्रमुख म्हणून बोलत होते. यावेळी ग्रामीण भागातील महिला बचत गटांना स्वावलंबी बनविणे, लघुउद्योगांना चालना देणे व आर्थिक बळकटी प्रदान करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे खासदार सोनवणे यांनी सांगितले. विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या माध्यमातून मंजूर कर्जांचे वितरण करण्यात आले. यावेळी महिलांशी संवाद साधत त्यांच्या भावना, अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. 'महिला सक्षम झाल्याशिवाय बीड सक्षम होऊ शकत नाही. बीड हा दुष्काळी जिल्हा अशी ओळख पुसून येथील महिला उद्योगजगतात नाव कमावतील, अशी नवी ओळख निर्माण करणे हेच आपले ध्येय आहे,' असे खा.सोनवणे यांनी स्पष्ट केले. बीड जिल्हा महिला उद्योगाचा जिल्हा बनवायचा आहे. प्रत्येक तालुक्यात महिला उद्योग मार्गदर्शन केंद्र, बचत गटांचे उद्योगात रूपांतर, कर्ज, प्रशिक्षण व बाजारपेठ उपलब्धता यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील,' असे त्यांनी सांगितले. 'तुम्ही मला खासदार बनवण्यासाठी घेतलेली मेहनत मी कधीही विसरणार नाही. तुमचा विश्वास सार्थ ठरवणे ही माझी जबाबदारी आहे,' असे भावनिक मतही खा.सोनवणे यांनी व्यक्त केले.



# वकील संघाच्या मागणीसंदर्भात उपविभागीय अधीकारी उदासीन

**किल्लेधारुर । वार्ताहर**

उशीरा मिळालेला न्यायही एकाप्रकारे अन्यायच असतो हे सुत्र लक्षात घेवुन राज्य शासन व न्याय संस्थाही न्यायदानात वेग येण्यासाठी विशेष, जलदगती न्यायालये, लोकन्यायालये,चालविण्यासोबत राज्यशासनाने लोकाभीमुख शासन व्यवस्था करण्यासाठी अर्धन्यायीक न्यायदान करणाऱ्यांना संबधीत तालुक्याच्या ठिकाणी जावुन शेतकऱ्यांचे व वकीलांचे वेळ पैसा व श्रम वाचविण्यासाठी न्याय देण्याचे आदेशीत केले आहे.मात्र माजलगांव येथील उपविभागीय आधीकाऱ्यांनी कार्यालयात फक्त बोर्ड रंगवुन भेटीचा तपशील दिला आहे.

यासंदर्भात वर्षापुर्वी वकील संघाच्या पदाधीकाऱ्यांनी लेखी निवेदन व मागणी करुनही प्रत्येक शुक्रवारी शेतीविषयक प्रकरणे चालविण्याबाबत चालढकल सुरु केली आहे.यामुळे वकील व अर्धन्यायीक प्रकरणातील पक्षकार असलेले शेतकरी यांना वेळ,पैसा व श्रम वाया जात आहे.सोबतच शासनाने लोकाभिमुख शासन देण्यासंबधी घेतलेल्या निर्णयास हरताळ फासला जात आहे.यासंदर्भात जिल्हाधीकारी,आयुक्तासह वरीष्ठ महसुल अधीकारी व लोकप्रतीनीधीनी लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे मत वकील संघाचे अध्यक्ष ड.परमेश्र्वर शिनगारे, अॅड.आर,व्ही,अवस्थी सह अनेक विधीज्ञ ,जागरुक नागरीक, शिक्षीत शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**अंबाजोगाई । वार्ताहर**

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शहर शाखेच्या उपस्थित वक्त्यांनी बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील समता, न्याय आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी बोलताना शहराध्यक्ष सुधाकर हातागळे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका जाती-धर्माचे नसून ते संपूर्ण बहूजन समाजाचे आणि मानवाधिकारांचे रक्षक होते. विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देखील शिवरायांच्या कार्याचा गौरव केला आहे असे मत यावेळी शहराध्यक्ष हातागळे यांनी व्यक्त केले. महापुरूषांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे कार्य सुरू असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सुधाकर हातागळे, प्रा.डॉ.भिमानंद गजभारे, बालासाहेब चव्हाण, अर्जुन वाघमारे, भारत दासूद, बाळू खांडके, सुधाकर वाघमारे, कल्याण जोगदंड, निलेश शेवाळे, दिलीप वैद्य, अविनाश घनघाव, निवृत्ती कांबळे तसेच भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेतर्फे निमंत्रित समता सैनिक दल, मयूर धन्वेहे आवर्जून उपस्थित होते.

# आ.सोळंके, आ.धस व आ.पंडित यांच्याकडून जगताप कुटुंबीयांचे सांत्वन





**वडवणी। वार्ताहर**

वडवणी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप आणि राष्ट्रवादीचे नेते भारत जगताप यांचे वडील अभिमन्यू विश्र्वंभर जगताप यांचे रविवारी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले आहे. मंगळवारी आष्टीचे आ.सुरेश धस, गुरुवारी माजलगांवचे आ.प्रकाश सोळंके व शुक्रवारी गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी व राजकीय, सामाजिक आणि इतर क्षेत्रातील मान्यवरांनी वडवणी याठिकाणी येत दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. व या दुःखाच्या प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत अशी भावना व्यक्त करुन धीर दिला.

वडवणी येथील नगराध्यक्ष शेषेराव जगताप व राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांचे वडील माजी उपसरपंच तसेच सर्वपरिचीत व्यक्तीमत्त्व अभिमन्यू आण्णा जगताप यांचे दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान रात्री १०:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सोमवारी दुपारी १२ वाजता वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी अतिशय जड अंतःकरणाने व साश्रू नयनांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच आष्टी-पाटोदा-शिरुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे पूर्वीपासूनचे स्नेही असणारे आ.सुरेश अण्णा धस यांनी या दुःखद प्रसंगी दि.१७ मंगळवार रोजी त्यानंतर माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे नेते तथा मार्गदर्शक असणारे आ.प्रकाश दादा सोळंके यांनी दि.१९ गुरुवार रोजी व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे पूर्वीपासूनचे स्नेही असणारे आ.विजयसिंह राजे पंडित यांनी दि.२० शुक्रवार रोजी वडवणी याठिकाणी येत दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. त्याचप्रमाणे माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार सुनिल दादा धांडे, माजी आमदार जनार्दन तुपे, माजी आमदार केशवराव आंधळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेशराव आडसकर, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मोहनदादा जगताप, जिल्हा परिषद सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस, ज्येष्ठ नेते नारायणराव डक, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.ज्योतीताई डक, ज्येष्ठ नेत्या सुशिलाताई मोराळे, नगराध्यक्ष सहाल चाऊस, नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, माजी नगराध्यक्ष अर्जून गायकवाड, माजी नगराध्यक्ष माधवराव निर्मळ, माजी नगराध्यक्ष शेषेराव फावडे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भाजप नेते मनोज पाटील, अशोकराव हिंगे, रमेश चव्हाण, गणेश उगले, कैलास माने, युवा नेते रामराव गिते, जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर, जिल्हा परिषद सदस्य प्रकाश कवठेकर, कल्याण कुलकर्णी, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक भूमी अभिलेख नेहरकर साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे मॅडम, जिल्हा परिषद सभापती कल्याण आबुज, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, माजी सभापती नितीन दादा नाईकनवरे, सीए बी.बी.जाधव साहेब, बीड शहर प्रमुख संतोष जाधव, संजय लाटे, ओंकार कुलकर्णी, मुख्याधिकारी पोपट निगळ, निखिल बिक्कड, माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे, ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे, नगरसेवक शरद यादव, नगरसेवक अमोल चव्हाण, गणेश तळेकर, भीमराव गायकवाड, गणेश भांडेकर, प्रा.अर्जून तनपुरे सर, प्रा.गोपाळ धांडे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, माजी उपनगराध्यक्ष गफार भाई, नगरसेवक लक्ष्मण सिरसट, उपसरपंच बाळासाहेब नागटिळक, बालासाहेब मुंडे, अनिल माने यांच्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांशी स्नेहबंध असणारे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप आणि राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांसह दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. व या दुःखाच्या प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत अशी भावना व्यक्त करुन धीर दिला.

# थोडक्यात

## यशवंत विद्यालयात शिवजयंती उत्साहात

बीड: शहरातील यशवंत विद्यालय या शाळेमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शिवजन्मोत्सवाच्या स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजन्मोत्सव निमित्त लेझीम पथकाची रॅली काढण्यात आली .यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ, प्रमुख पाहुण्या संस्थेच्या संचालिका तथा यशवंत प्राथमिक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती सुधामतीताई वाघ, संस्थेचे सचिव नामदेव वाघ,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम. एस. चंपावती विद्यालयाचे शिक्षक बहिरमल के. एम. सावरकर विद्यालयाचे शिक्षक चव्हाण एस. एल. हे उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवण्याची मागणी

बीड : शहरातील बस स्थानकात येणाऱ्या दहा दिवसात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शाम वीर यांनी दिला आहे. बीड बस स्थानकामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवण्यात यावी अशी मागणी गत अनेक दिवसापासून करण्यात येत आहे. मात्र एसटी महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत येणाऱ्या दहा दिवसात संबंधित अधिकाऱ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा नाही बसवली तर स्वतः आम्ही महामंडळात अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसून व आंदोलनही करण्यात येईल असा इशारा शामवीर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## खर्डेवाडी येथे श्रीमद् भागवत कथा

बीड: जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी (ता. बीड) येथे गुरुवार दि. २६ फेब्रुवारी पासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ होत आहे.नांदूर फाट्याजवळील खर्डेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने रामचंद्र महाराज जगताप (बीड) यांच्या वाणीतून श्रीमद् संगीत भागवत कथा निरूपण होणार आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत भागवत होईल.सोहळ्यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा हरिपाठ होणार आहे.

## के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती

बीड : शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन शाळेच्या परिसरातुन रॅली काढण्यात आली. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा तर मुलींनी पारंपारिक वेशभुषा धारण केली होती. छोटया चिमुकल्याच्या रॅलीमुळे सर्व परिसर दुमदुमला होता. सर्वांनी मुलांचे खुप कौतुक केले. यावेळी मुलांनी महाराजा विषयी आपले मनोगत खुप गोड शब्दात सादर केले. तसेच उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मुलांना महाराजाच्या जीवनकार्या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ऋषिकेश शेळके, अंजली शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## राडी येथे शिवजयंती उत्साहात साजरी



राडी : अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि.१९ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली प्रथमतः महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर रूद्राभिक्षेक करण्यात आला यावेळी गावातील नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते , चौकात भगवे झेंडे व पताका लावण्यात आल्यामुळे वातावरणात नव चैतन्य निर्माण झाले होते , संध्याकाळी टाळ मृदंगाच्या गजरात शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची शोभायात्रा पालखीतून काढण्यात आली या शोभायात्रेत चिमुकल्या शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा करून शोभायात्रेत सहभागी झाल्याने शिवप्रेमींचा उत्साह वाढवला , गावात घरोघरी रांगोळी काढून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौकात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याने सेल्फी काढण्यासाठी शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती ,

## भगवानबाबा प्रतिष्ठान आज ह.भ.प. रामगिरी शास्त्री महाराज यांचे कीर्तन

बीडः येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून सर्वधर्म समभाव



अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.०० वाजत ह.भ.प. रामानंद महाराज पुरी व ह.भ.प. उषाताई महाराज मुंडे यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात ह.भ प. रामगिरी महाराज शास्त्री , येळेश्वर संस्थान, येळी यांचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर दररोज महाप्रसाद होणार आहे.श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आयोजित प्रवचन व कीर्तनाचा भाविकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोकणातून येणाऱ्या पाण्यात जिल्ह्याचा हिस्सा किती ?

## लोक संवाद बैठकीत शेतकऱ्यांकडून लोकप्रतिनिधींना विचारणा

**बीड । वार्ताहर**

मराठवाड्यातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कोकणातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. या योजनेला नाव मराठवाड्यातील असले तरी सध्या बहुतांश प्रकल्प नाशिक भागातील होत आहेत. १६८ टीएमसी पाण्याचे नियोजन करणे सुरु आहे, या पाण्यातून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, असा रोकडा सवाल श्रृंगऋषीगड येथे आयोजित संवाद बैठकीत उपस्थित शेतकर्यांनी लोकप्रतिनिधींना केला.

या बैठकीस बप्पासाहेब तळेकर, राजसाहेब पवळ, भाऊसाहेब जरांगे पाटिल, शिवप्रसाद खेडकर, रामराव खेडकर, ह.भ.प.सुरेश महाराज कोळेकर,धुराजी बाबा कोळेकर, राज पाटील, अशोकराव निपटे, तुकाराम तळतकर, परमेश्वर वाघमोडे, गावडे मामा, गणेश कोळेकर, महादेव कारांडे, सुधीर माने भारत सोळुंके, गोपाल आहेर, भाऊसाहेब महानोर, सरपंच नंदकुमार शिंदे, दीपक जाधव आदींसह शेतकरी उपस्थित होते.सिंदफणा पट्ट्यासह बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरण अथवा पाटाचे पाणी मिळत नाही. त्यातच बीड जिल्ह्यात दर तीन चार वर्षांने दुष्काळ पडतो. त्यामुळे फळबाग, ऊस, भाजीपाला उत्पादकसह इतर शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या शेतकऱ्यांना जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी तीनशेपेक्षा अधिक गावांनी एकत्र येत लोकलढा



आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाची महत्वाची वार्षिक बैठक शिरूर तालुक्यातील श्रृंगऋषीगड येथे आयोजित केली होती. या बैठकीत लोकलढा आंदोलनाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलतज्ज्ञ

पान २ वर ⏭

## तालुकास्तरावर मिळणार दिव्यांग प्रमाणपत्र

**बीड । वार्ताहर**

जिल्हाभरातील दिव्यांग नागरिकांना प्रमाणपत्र काढण्यासाठी आतापर्यंत केवळ बीड जिल्हा रुग्णालय येथेच जावे लागत होते. त्यामुळे ग्रामीण भागातील दिव्यांगांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत होती. ही बाब शासनाच्या निदर्शनास येताच आरोग्य विभागाने महत्त्वाचा निर्णय घेत जिल्हा शल्यचिकित्सकांना ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्येच दिव्यांग प्रमाणपत्राची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करत बीड जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक सतीशकुमार सोळंके यांनी दिव्यांगांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. आता दिव्यांगांना आपल्या जवळच्या ग्रामीण किंवा उपजिल्हा रुग्णालयातच तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. राज्य शासनाच्या वतीने दिव्यांगांसाठी विविध शासकीय योजना व सवलती राबवण्यात येतात. मात्र, त्या लाभांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र अनिवार्य असते. यासाठी आतापर्यंत दिव्यांगांना दुरदूरवरून बीड येथील जिल्हा रुग्णालयात यावे लागत होते. एकाच ठिकाणी मोठी गर्दी होत असल्याने अनेक वेळा दिव्यांगांना प्रमाणपत्र न मिळताच परतावे लागे. आता या समस्येवर तोडगा काढण्यात आला असून माजलगाव, गेवराई, आष्टी, केज आणि परळी या तालुक्यांतील दिव्यांगांना आपल्याच तालुका उपकेंद्र किंवा उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. तसेच शिरूर, पाटोदा, बीड आणि वडवणी या भागांतील दिव्यांगांसाठी बीड जिल्हा रुग्णालयातच प्रमाणपत्राची सुविधा सुरू राहणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, दिव्यांग प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी आणि प्रमाणपत्र वितरण हे दोन्ही एकाच ठिकाणी होणार असल्याने दिव्यांगांची होणारी फरफट थांबणार आहे. वेळेची बचत होणार असून प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होणार आहे.या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील हजारो दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून आरोग्य विभागाच्या या संवेदनशील निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## दुचाकीची समोरासमोर धडक, एकाचा मृत्यू

**बीड । वार्ताहर**

बुलेट आणि स्कुटीची समोरा समोर धडक होऊन झालेल्या अपघातात स्कुटीवरील शेतकरी जागीच ठार झाल्याची घटना शनिवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास शहरापासून जवळच असलेल्या बीड-पेंडगाव रोडवरील मिनी बायपास कॉर्नरवर घडली.

बीड शहरापासून जवळच असलेल्या मिनी बायपास कॉर्नरवर भरधाव वेगातील बुलेट (क्र एम.एच.१२. एन.एल. ३७१४) आणि स्कुटी (क्र. एम.एच.२३.४०५०) या दोन्ही गाड्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात स्कुटीवरील विष्णू बाबुराव शिंदे (वय ५०, रा. पेंडगाव ता. बीड) यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होऊन त्यांना जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली.



बीड : शहरातील घोडके हॉस्पिटल येथे शिवजयंती निमित्त ९७ रुग्णांची मोफत रक्त तपासणी करुन मोफत औषध उपचार करण्यात आले.या प्रसंगी डॉ.विशाल कोटेचा,डॉ.सोमनाथ वाघमारे ,डॉ.सौ.कीर्ती कुलकर्णी,डॉ.रोहित शिंदे,डॉ.प्रदीप आंधळे, डॉ. गोरख वायभट,डॉ.प्रवीण रत्नपारखी,डॉ.प्रदीप धूताड़मल यांनी रुग्ण तपासणी केली.रक्ततपासणी आदर्श लॅबचे शिवप्रसाद घोडके योनी केली.आयोजक डॉ.रमेश घोडके आणि डॉ.सौ उर्मिला घोडके यांनी सर्वांचे आभार मानले.

## बीड शहरात घंटागाडीचा खोळंबा

## बीडकर त्रस्त, स्वच्छतेचा मोठा प्रश्न ऐरणीवर

**बीड । वार्ताहर**

बीड शहरातील जुनाबाजार, देशमुखगल्ली, काळेगल्ली, धोंडीपुरा आदी भागांमध्ये दोन दिवसाआड येणारी घंटागाडी नियमितपणे न आल्यामुळे नागरिकांना घरातच कचरा साठवण्याची वेळ आली आहे. परिणामी नागरिकांकडून सदरील प्रभागांमध्ये घंटागाडी नियमित सुरू करण्याची जोरदार मागणी होत आहे.

शहरात नवीन नगराध्यक्ष व नगरसेवकांची निवड झाल्यानंतर सर्व प्रभागांमध्ये घंटागाडी सेवा सुरळीत सुरू होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र प्रत्यक्षात अनेक नागरी वसाहती व प्रभागांमध्ये घंटागाडी अजूनही पोहोचत नसल्याचे वास्तव समोर येत आहे. यामुळे नागरिकांना कचरा टाकण्यासाठी पर्याय नसल्याने मोकळ्या जागा, रस्त्यालगतची झाडाझुडपे येथे कचरा टाकला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

ठिकठिकाणी साचलेल्या

पान २ वर ⏭

## आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी केली रेल्वे मार्ग रचना आणि सुरक्षिततेचे निरिक्षण

**बीड । वार्ताहर**

अभियांत्रिकी शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कार्यपद्धतीशी जोडले गेले पाहिजे, या उद्देशातून आदित्य पॉलिटेक्निक, बीड येथील प्रथम व द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांची भारतीय रेल्वे, बीड येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. सकाळी १० ते



दुपारी २ या वेळेत झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण, रेल्वे अभियांत्रिकीची प्रत्यक्ष माहिती आत्मसात केली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिति सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या अधिपत्याखाली ही भेट पार पडली. रेल्वे स्टेशन, बीड येथे विद्यार्थ्यांनी ट्रॅक लेआउट, पुलांची रचना, देखभाल पद्धती आणि सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या

पान २ वर ⏭

## माजलगावात ऊसतोड कामगारासाठी आज मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**माजलगाव । वार्ताहर**

ऊसतोड कामगार, वाहतूकदार व कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आज सोमवारी भोगलवाडी येथील वैष्णवी देवी मंदिर येथे आयोजित करण्यात आले आहे. हा उपक्रम कै. सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना व भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

या आरोग्य शिबिरात रक्तातील साखर, रक्तदाब, हिमोग्लोबीन तपासणी, बीएसआय मोजमाप तसेच सामान्य वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. कारखान्यातील कामाचे स्वरूप

पान २ वर ⏭

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये मिरवणूक

### जयंती उत्सव समितीची घोषणा-ॲड. सुधीर जाधव

**बीड । वार्ताहर**

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या सार्वजनिक जयंती उत्सवानिमित्त सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड शहरात भव्य मिरवणूक व विविध सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती उत्सवात परीट समाज बांधवांसह सर्व गाडगेबाबा प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



जयंती उत्सव कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुतळ्यास अभिवादन करून होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता राष्ट्रसंत गाडगेबाबा सांस्कृतिक सभागृह, मोंढा रोड, बीड येथे मठामध्ये प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे.सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणुकीस प्रारंभ

पान २ वर ⏭

## शिवरायांनी उभारलेले स्वराज्य सर्वसामान्य माणसांच्या सन्मानासाठी- डॉ.तात्यासाहेब मेघारे

**गेवराई । वार्ताहर**

शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य हे केवळ भौगोलिक विस्ताराचे स्वप्न नव्हते, तर ते सामान्य माणसाच्या सुरक्षिततेसाठी, सन्मानासाठी व न्यायासाठी उभे राहिलेले लोकशाही मूल्यांचे बीज होते, असे प्रतिपादन डॉ.तात्यासाहेब मेघारे यांनी केले.



गेवराई येथील सिध्दीविनायक कॉलनी येथे १९फेब्रुवारी रोजी शिवजयंती चे अयोजन केले होते.या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पञकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर हे होते.पुढे बोलतांना मेघारे म्हणाले की छत्रपती शिवराय यांनी आठरा पगड जाती ला सोबत घेऊन स्वराज्याची निर्मिता केली.त्यांच्या राज्यात सर्वांना समान न्याय होता. लोकाभिमुख प्रशासन,न्याय निष्ठा,महिला विषयी असलेला सम्मान शेतकरी,

पान २ वर ⏭

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दिलीप मधुकर खिस्ती यांनी लोकप्रश्न प्रिंटर्स डी.पी.रोड,स्नेहनगर, बीड - ४३११२२ येथे छापून, कार्यालय दै.बीडचा लोकप्रश्न, स्टेडियम कॉम्प्लेक्स सहयोगनगर, बीड जि.बीड-४३११२२ येथे प्रकाशीत केले. दुरध्वनी - २२९८९०,जाहिरात विभाग-२२१८४१ फॅक्स २२८८९०, **संपादक- दिलीप मधुकर खिस्ती,** dainiklokprashna@gmail.com,beedlokprashna@gmail.com

Daily Beedcha Lokprashna Owner, Printer, Publisher and Editor Deelip Madhukar Khisti has Printed In Lokprashna Printers, D.P.Road, Sneh Nagar, Beed- 431122 and Published In Office of Daily Beedcha Lokprashna, Stedium Complex, Sahayog Nagar, Beed- 431122 Phone-02442- 229890. **E-mail- beedlokprashna@gmail.com, dainiklokprashna@gmail.com**

CMYK